


कुलगुरु कै. वि. गं. तथा
दादासाहेब केतकर



धनुर्धारी श्रीराम लक्ष्मण

स्थापना १२ मे १९०९



शिक्षणमहर्षी कै. डॉ. ग. श्री.
तथा अण्णासाहेब खैर


पुणे विद्यार्थी गृहाचे मासिक

# समाचार

**Pune Vidyarthi Griha's 'Samachar' Magazine July 2024 - Pages - 40**

संपादक : श्री. राजेंद्र विठ्ठल बोऱ्हाडे    कार्यकारी संपादक : श्री. सुभाष मल्लाप्पा जिर्गे

* पुणे * वर्ष ७५ * अंक ९ * किंमत रु. १०/- * वार्षिक वर्गणी रु. १००/-




दि. ६ जून २०२४ रोजी पंचवटी शाखा, नाशिक येथे
श्री केशव महाराज पुण्यतिथी कार्यक्रम प्रसंगी
श्री केशव महाराज यांची पूजा करताना कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे
शेजारी छायाचित्रामध्ये फुलांनी सजविलेली श्री केशव महाराजांची प्रसन्न मूर्ती

## ❊ श्री केशव महाराज पुण्यतिथी कार्यक्रम, पंचवटी शाखा, नाशिक क्षणचित्रे ❊





श्री केशव महाराज पुण्यतिथीनिमित्त
पूजा करताना कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे



श्री केशव महाराज यांची आरती करताना
देणगीदार श्री. सदानंद केंघे



देणगीदार श्री. सदानंद केंघे
यांना वाढदिवसानिमित्त
पुष्पगुच्छ देऊन शुभेच्छा
देताना कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे,
समवेत कार्यवाह श्री. संजय गुंजाळ,
कोषाध्यक्ष श्री. कृष्णाजी कुलकर्णी,
संचालक श्री. आनंद कुलकर्णी
आणि श्री. अमोल जोशी



रुद्राभिषेकानंतर
महाप्रसादाचा लाभ घेताना
कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे,
कार्यवाह श्री. संजय गुंजाळ
कोषाध्यक्ष श्री. कृष्णाजी कुलकर्णी,
देणगीदार श्रीमती गंगूताई धामणकर,
आदी मान्यवर

संपादकीय

# आषाढी एकादशीनिमित्ते

युगानुयुगे योगीजनांना आणि सर्वसामान्य प्रापंचिकांनाही 'विटेवरी पाय' आणि 'कटिवरी हात' घेऊन उभ्या असलेल्या, 'रासज सुंदर मदनाचा बाळ' असलेल्या, मौजेच्या पंढरीरायाने अक्षरशः भारावून टाकले आहे. वेडे करून सोडले आहे.

या 'सावळ्या परब्रह्माने' 'माझे माहेर पंढरी' असा आम जनतेला एक दिलासा दिला आहे. जगण्याची एक नवी उमेद दिली आहे. त्यांच्या आयुष्याला एक नवा अर्थ आणि अयाम दिला आहे. सभोवतालच्या परिस्थितीला शरण न जाता किंवा त्या परिस्थितीतच रंगून न जाता आपले स्वतःचे आणि पर्यायाने संपूर्ण समाजाचे उन्नयन साधण्याचा एक नवा राजमार्ग प्रस्थापित केला आहे. परिपूर्णतेचा हा खेळ आपल्या चरणाश्रितांच्या सहाय्याने तो विठ्ठल रंगवत आहे.

'वाळवंटी चंद्रभागेच्या काठी' त्याने मांडलेला हा भावभक्तीचा डाव पिढ्यानुपिढ्या सुरुच असला तरी, त्याची रंगत मात्र अजूनही जरासुध्दा ओसरली नाही. कालौघात प्रत्येक भिडू सोबत त्याने मांडलेला हा डाव खरोखरच आगळावेगळा आणि अलौकिक आहे. चंद्रभागेच्या तीरी एक नवी संस्कृतीच त्याने उदयाला आणली. चंद्रभागेच्या वाहत्या जीवनप्रवाहाच्या साक्षीने बहरणारी ही लोकसंस्कृती वाळवंटात नंदनवनच उमलवणारी आहे. वाळूमध्ये कधीच कुठलेही ठसे उमटत नाहीत, या जाणीवेने 'काळाच्या माथा पाय' देण्याचे सामर्थ्य असलेल्या, लोकसंस्कृतीच्या या पावन गंगेत सहभागी होणाऱ्या दिग्गजांनी आपापल्या कर्तृत्वाने 'हरिनामाचा झेंडा' रोवला असला तरी, आपल्या कर्माकर्माचे ठसे कुठेही उमटू नयेत याचीही अगदी काया - वाचा - मने काळजी घेतली. अहंकाराच्या वाऱ्याचा अगदी हलकासासुध्दा स्पर्श आपल्याला न व्हावा म्हणून त्या विठूरायाचीच कळवळ्याने प्रार्थना करत विश्वकल्याणासाठी 'पसायदान' मागितले.

चंद्रभागेच्या तीरी हरिनामाची पेठ वसवणाऱ्या या संतांनी,

'भरणी आली मुक्त पेठा । करा लाटा व्यापार ।
उधार घ्या रे, उधार घ्या रे । अवघे या रे जातीचे ।फ

असे आवाहन केले आणि समाजातील विषमतेचे निर्दलन करण्याचा ओनामा केला.

जनजागरण कार्यातले वारकरी संप्रदायाचे हे कर्तृत्व आणि योगदान खरोखरच अलौकिक आणि चकित करणारे आहे. वारकरी संप्रदायाचा काळ जर, आपण लक्षात घेतला तर, परकियांच्या जुलमी आक्रमणामुळे हतप्रभ आणि निराश झालेल्या समाजाला जीवन वैभवाचे आणि वैराग्याचे बळ वारकरी संप्रदायाने दिले. त्या वारकरी संप्रदायाच्या भगव्या निशाणाने समाजात एक नवी उमेद आणि नवा जोष निर्माण केला. आपण वारकरी असलो तरी, 'रामनामाची फिरंग' घेतलेले धारकरीही आहोत हे आत्मभान निर्माण केले. धर्मांतर करून 'प्याद्याचा फर्जी' होता येते हे वरकरणी भुलवणारे व्यावहारिक फायदे महत्त्वाचे न मानता वारकरी संप्रदायाने सर्वसामान्यांसाठी जीवनश्रेयाचा मार्ग खुला केला. नाथपंथीय गुरुपरंपरा असलेल्या संत ज्ञानेश्वरांनी संप्रदायाचा पाया रचला तर, त्याकाळात संत नामदेवांनी दोनदा थेट पंजाबपर्यंत मजलदरमजल करीत वारकरी संप्रदायाचा विस्तार केला. ज्ञानेश्वरीची शुध्द प्रत तसेच एकनाथी भागवत व बहुरूढ भारूडादी रचना करून संत एकनाथांनी भागवत धर्माला मोठा बळकट आधार दिला आणि आपल्या साधकावस्था ते सिध्दावस्थेचा प्रवास आपल्या अभंगवाङ्‌मयातून अधोरेखित करत संत तुकारामांनी या वारकरी संप्रदायावर कळस चढविला. या वारकरी संप्रदायाने आध्यात्मिक आणि समाजजीवनात लोकशाही रूजविण्याचा प्रयत्न केला. सर्वसामान्य प्रापंचिकाला 'मुखी नाम, हाती मोक्ष' या अनुभूतीने एक आत्मभान दिले. या आत्मभानामुळेच,

‘ डोईचा पदर आला खांद्यावरी । भरल्या बाजारी जाईन मी ।।
हाती घेऊन टाळ खांद्यावरी वीणा । आता मज मना कोण करी ।।
पढंरीच्या पेठे मांडियेले पाल । मनगटावर तेल घाला तुम्ही ।।’

असे त्या काळातील जनाबाई मोठ्या अभिमानाने व दृढतेने ठणकावते.

‘वेदांचा तो अर्थ आम्हासीच ठावा । येरांनी वहावा भार माथा ।।’

या आत्मविश्वासाने तुकारामादी संत मंडळींनी जीवन परिपूर्णत्वाचा ज्ञान, योग, भक्ती आणि कर्ममार्ग उलगडून सांगितला. त्यामुळेच वारकरी संप्रदायात मोठ्या अभिमानाने गर्जून सांगितले जाते.

‘आम्ही बीघडलो । तुम्ही बीघडना ।।

चंदनाच्या संगे बोरी बीघडल्या । बोरी बीघडल्या चंदनचि झाल्या ।।
सागराच्या संगे नदी बीघडली । नदी बीघडली सागरचि झाली ।।
परिसाच्या संगे लोह बीघडले । लोह बीघडले सुवर्णचि झाले ।।
सद्‌गुरुसंगे शिष्य बीघडला । शिष्य बीघडला सद्‌गुरुचि झाला ।।
विठ्ठलाच्या संगे तुका बीघडला । तुका बीघडला विठ्ठलचि झाला ।।’

वस्तुतः स्वधर्मे निधनम् श्रेयः, परधर्मो भयावहः ।। असे सांगितले जाते पण, वारकरी संप्रदायात बी-घडण्याची परिपूर्णत्व आत्मसात करण्याची प्रक्रिया असल्याने नदी, लोह, बोरी, शिष्य आणि स्वतः तुकाराम महाराजांचे झालेले आमूलाग्र परिवर्तन हे निश्चितपणे गौरवास्पद आहे. ही जीवनाला परिपूर्णत्व देणारी, श्रेयमार्गाचे महात्म्य दर्शविणारी आणि कुठल्याही कर्मकांडांचे अवडंबर न माजवता ‘कर्मे ईशु भजावा’ ही साधी, सोपी व मानवतेची शिकवण वारकरी संप्रदायाची असल्याने, आजही वारकरी संप्रदायाची पाळेमुळे आपल्या समाजजीवनात रुजलेली आहेत. एवढेच नव्हे तर उच्चशिक्षितांनाही आपल्याकडे आकर्षित करते व आपल्या परंपरेचे उपासक बनवते. आधुनिक महाराष्ट्रातले अनेक विचारवंत मोठ्या निष्ठेने आपल्या कृतीउक्तीतून कुठल्याही प्रकारे गाजावाजा किंवा जाहिरातबाजी न करता या संप्रदायाचा डोळस अभ्यास करतात. डॉ. इरावती कर्वे, गौतमबुवा पाठक, सोनोपंत दांडेकर या दिग्गजांनी तर, वारकरी संप्रदाच्या आत्मज्ञानाची आधुनिक काळाशी सांगड घातली. आजही अनेक डॉक्टर्स, इंजिनिअर्स्, प्राध्यापक आणि इतर उच्च शिक्षित व प्रज्ञावंत मंडळी मोठ्या अहमहमिकेने दिंडीत सामिल होतात. वारकऱ्यांच्या रूपातील विठ्ठल सेवा करताना स्वतःला धन्य समजतात.

आषाढी एकादशीच्या निमित्ताने ‘अंतरीचा ज्ञानदिवा मालवू नको रे’ या वारकरी संप्रदायाच्या लाखमोलाच्या शिकवणूकीचे स्मरण करत प्रत्येकाने स्वतःचे व त्याचबरोबरीने संपूर्ण समाजाचे उन्नयन साधत ‘याचि देही याचि डोळा’ मुक्तीचा सोहळा अनुभवावा. त्यासाठीचे बळ आणि बुध्दी विठ्ठलकृपेने सर्वांना मिळू दे.

‘जो जे वांछिल, तो ते लाहो, प्राणिजात।’

हीच विठ्ठलचरणी प्रार्थना.

दि. २८ जून २०२४
संत तुकाराम महाराज पालखी प्रस्थान - देहू

## श्री केशव महाराज पुण्यतिथी कार्यक्रम उत्साहात साजरा

**संचालक श्री. अमोल जोशी**

दि. ६ जून २०२४ रोजी प्रतिवर्षी प्रमाणे श्री केशव महाराज पुण्यतिथी साजरी करण्यात आली. कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे यांच्या हस्ते श्री. केशव महाराज यांच्या संजीवन समाधीस रुद्राभिषेक करण्यात आला. या प्रसंगी कार्यवाह श्री. संजय गुंजाळ, कोषाध्यक्ष श्री. कृष्णाजी कुलकर्णी आणि संचालक श्री. आनंद कुलकर्णी उपस्थित होते.

तसेच संस्थेचे ज्येष्ठ देणगीदार श्री. सदानंद केंघे, श्री. श्रीकृष्ण देशपांडे, श्रीमती गंगुताई धामणकर, माजी विद्यार्थी मंडळाचे अध्यक्ष डॉ. एकनाथ कुलकर्णी हे ही उपस्थित होते. रुद्राभिषेकानंतर सर्वांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.

श्री केशव महाराज पुण्यतिथीच्या कार्यक्रमासाठी श्री. काशीनाथ उपकारे हे प्रतिवर्षी विशेष मदत करीत असतात. याही वर्षी त्यांनी आपली सेवा महाराजांच्या चरणी अर्पण केली.

ज्येष्ठ देणगीदार श्री. सदानंद केंघे यांना त्यांच्या वाढदिवसानिमित्त कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे यांच्या हस्ते शाल, श्रीफळ, पेढे, पुष्प गुच्छ देऊन शुभेच्छा देण्यात आल्या. सर्व उपस्थितांचे आभार संचालक श्री. अमोल जोशी यांनी मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संस्था व विद्यालय कर्मचारी यांनी मनापासून योगदन दिले. ***

## गुरु-संभावनेची नष्टपण इष्टपरंपरा

आपली मुले शाळेत शिकतात. प्रतिवर्षी यशस्वी होऊन वरच्या वर्गात जातात, सात वर्षांनी मॅट्रिक - एस्. एस्. सी. होऊन बाहेर पडतात. पेढे वाटले जातात. प्रकरण तेथेच संपते.

या मुलांना वर्षभर घसाफोड करून शिकविणाऱ्या गुरूंचा विचार किती पालक करितात? आपल्या मुलां-मुलींच्या यशात त्यांच्या गुरूंचाही अंश आहे याची आठवण किती पालक ठेवतात?

ज्या शाळेने त्यांना सात-आठ वर्षे शिक्षण दिले त्या शाला-मातेचे स्मरण किती जणांना होते?

प्राचीन गुरुकुले आणि शाळा यांची उदाहरणे देऊन गुरू आणि शाळा यांच्यापासून आपण नि:स्वार्थी ध्येययुक्त कामाची अपेक्षा करतो; पण त्याचबरोबर या गुरूंचा आणि गुरुकुलांचा सन्मान करणाऱ्या प्राचीन पालकांच्या आदर्श कृतज्ञतेचे विस्मरण करतो.

शिक्षकांच्या निर्धन आणि कष्टमय जीवनात शिष्यांची आणि पालकांची कृतज्ञता-बुद्धी हाच एक विरंगुळा असतो. त्यांना फार अपेक्षाही नसते. तुम्ही एखादे अभिनंदनाचे पत्र पाठविले तरी त्यांना धन्य वाटेल. घरी बोलावून पेलाभर पाणी आणि लवंग-सुपारी दिली तरी त्यांना कृतकृत्य वाटेल. यापेक्षा अधिक इमानाची अपेक्षा त्यांना नाही. किंबहुना त्यांना कशाचीच अपेक्षा नाही. हे आपले पालकांचे आणि शिष्यांचेच आवश्यक कर्तव्य आहे.

शिक्षण पूर्ण करून गेलेल्या विद्यार्थ्यांची आणि त्यांच्या पालकांची आभारपत्रे आली तर शाळा-चालकांना धन्यता वाटेल. श्रमाचे चीज झाल्यासारखे वाटेल.

एवढ्या साध्या शिष्टाचारालाही आपला समाज महाग झाला आहे. भारतीय संस्कृती! उज्ज्वल परंपरा! कशाला वृथा अभिमान? फुकाचा बोल, तोही खर्चायला पालक नाखूष!

याचे नाव बाजारीपणा. आम्ही फी देतो. शाळा शिक्षण देतात. मास्तर शिकवतात. त्यात कसली कृतज्ञता अन् कसले आभार! ही आपली वृत्ती आहे. फी देणारे आणि फुकट शिकणारे-सर्वांच्या ठिकाणी एकच वृत्ती आहे. ही इष्ट आहे का?

नाही! नाही! ही आपली परंपरा नाही!!! मुलांनी व आपण पालकांनी आपली उदासीन वृत्ती बदलली पाहिजे. गुरूच्या कार्याचे आणि शाला-मातेच्या सेवेचे योग्य श्रेय कृतज्ञ शब्दांनी आणि उदार कृतीने त्यांना द्या, म्हणजे शिक्षकांच्या जीवनात आणि शालांच्या कामात एक नवीन जिव्हाळा निर्माण होईल. हे वाचून विसरून जाऊ नका. इतरांना सांगा. स्वत: आचरा.

**डॉ. ग. श्री. खैर (जुलै १९५५)**

# महाराष्ट्र विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, पुणे

**संचालक : डॉ. राजेंद्र सं. कांबळे**
**प्राचार्य : श्री. व्ही. पी. गावडे**

### इ. १२ वी निकाल

फेब्रुवारी २०२४ मध्ये झालेल्या इ. १२ वी परीक्षेचा निकाल जाहीर झाला. या परीक्षेस विद्यालयामधून एकूण १८७ विद्यार्थी परीक्षेला बसले होते. त्यापैकी १८५ विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले. कनिष्ठ महाविद्यालयाचा निकाल ९८.९३% लागला. तसेच MCVC विभागाचा निकाल ५५% लागला. प्रथम पाच क्रमांक प्राप्त विद्यार्थी पुढील प्रमाणे

| विद्यार्थ्याचे नाव | विभाग | शेकडा गुण | क्रमांक |
|---|---|---|---|
| कु. ईशान स. कढे | इले. मेंटेनन्स | ८५.०० | प्रथम |
| कु. स्वप्ना सं. खिरे | आय. टी. | ८४.०० | द्वितीय |
| कु. आयुष जि. लाठी | सी. एस. | ८३.३३ | तृतीय |
| कु. श्रावणी श. थोरात | इले. मेन्टेनन्स | ८३.१७ | चतुर्थ |
| कु. अमेय यो. फडके | इले. मेन्टेनन्स | ८२.६७ | पाचवा |

### अभिनंदनीय

कु. अमेय योगेश फडके या इलेक्ट्रिकल मेंटेनन्स विभागातील विद्यार्थ्याची NDA खडकवासला येथील Air Force विभागात Flying Officer म्हणून निवड झाली आहे.

सर्व विद्यार्थ्यांना उत्कृष्ट मार्गदर्शन करणाऱ्या कनिष्ठ महाविद्यालयामधील शिक्षकांचे आणि प्राचार्य श्री. वि. पां. गावडे यांचे संस्थेतर्फे विशेष अभिनंदन. तसेच सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे आणि त्यांच्या पालकांचे, शिक्षक, प्राचार्य आणि संस्था पदाधिकारी यांच्या मार्फत खूप खूप अभिनंदन आणि विद्यार्थ्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा !

### नवीन शैक्षणिक वर्षाचा आरंभ

सन २०२४ - २५ या शैक्षणिक वर्षाचा आरंभ शनिवार दि. १५ जून २०२४ रोजी झाला. प्राचार्य वि. पां. गावडे यांच्या हस्ते गुलाबपुष्प आणि वह्या देऊन विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. तसेच इ. ५वी ते ८ वी च्या विद्यार्थ्यांना प्राचार्य वि. पां. गावडे आणि प्रशालेतील सर्व शिक्षकांच्या हस्ते शासनातर्फे देण्यात आलेल्या मोफत पाठ्यपुस्तकांचे वाटप करण्यात आले. या प्रसंगी विद्यार्थ्यांना खाऊवाटप करण्यात आले.

### गुरूवर्य कै. अण्णासाहेब खैर जयंती

शनिवार दि. १५ जून २०२४ रोजी महाराष्ट्र विद्यालयाचे संस्थापक शिक्षणमहर्षी डॉ. ग. श्री. तथा अण्णासाहेब खैर यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाच्या आरंभी प्राचार्य वि. पां. गावडे यांच्या हस्ते गरूवर्य कै. अण्णासाहेब खैर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. प्राचार्य वि. पां. गावडे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. शिक्षणमहर्षी डॉ. अण्णासाहेब खैर यांच्या कार्याची माहिती अध्यापक श्री. ज्ञानेश्वर दाते यांनी दिली तसेच त्यांनी या कार्यक्रमाचे सूत्रसंचालनही केले. फलकलेखन अध्यापक श्री. युवराज मिरखलकर यांनी केले. या कार्यक्रमास प्रशालेतील सर्व शिक्षक - शिक्षकेतर सेवक, इ. ५ वी ते १० वी चे विद्यार्थी उपस्थित होते. अध्यापिका श्रीमती वैशाली मोघे यांनी आभार प्रदर्शन केले.

### मोफत वह्या वाटप

दि. २२ जून २०२४ रोजी प्रशालेतील इयत्ता ५ वी ते १० वी च्या विद्यार्थ्यांना महाराष्ट्र विद्यालयाच्या माजी विद्यार्थी मंडळातर्फे मोफत वह्यांचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व उपस्थितांचे स्वागत प्राचार्य वि. पां. गावडे यांनी केले. या कार्यक्रमास श्री. मंगेश करपे, श्री. अभिजीत बडदे, श्री. धीरज धांदल, श्री. निलेश खोंदापुरे, श्री. सचिन पवार, श्री. रोहित राऊत, श्री. अमर निकम, श्री. श्रीराज शिंदे, तसेच सर्व शिक्षक - शिक्षकेतर सेवक, प्रशालेतील विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अध्यापक श्री. ज्ञानेश्वर दाते यांनी केले. याप्रसंगी सुंदर फलकलेखन अध्यापक श्री. युवराज मिरखलकर यांनी केले. अध्यापिका सौ. प्राजक्ता चोपडे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

***

# मुक्तांगण इंग्लिश स्कूल व कनिष्ठ महाविद्यालय

**संचालक : श्री. आनंद कुलकर्णी**
**उपकार्याध्यक्ष : श्री. एस. एम. जिर्गे**
**प्राचार्या : सौ. मीना राणे**
**पर्यवेक्षिका : सौ. रेखा बाली**

## पूर्व प्राथमिक विभाग

### बनी टमटोला प्रशिक्षण

दि. १० जून ते १२ जून २०२४ या कालावधीमध्ये भारत स्काऊट अँड गाईड चे बनी टमटोला पूर्व प्राथमिक प्रशिक्षण शिबीर, सदाशिव पेठ, पुणे येथे आयोजित करण्यात आले होते. या प्रशिक्षण शिबिरात सौ. दिपाली पाध्ये व सौ. सोनल काणे यांनी सहभाग घेतला आणि प्रशस्ती पत्रक प्राप्त केले.

### नवीन शैक्षणिक वर्षारंभ

दि. १० जून २०२४ रोजी नवीन शैक्षणिक वर्ष अतिशय उत्साहात सुरू झाले. शिक्षकांनी सर्व वर्ग सुंदर सजविले होते. सर्व वर्गांमध्ये बसविलेल्या नवीन स्मार्ट बोर्डवर शिक्षण घेण्याचा आनंद विद्यार्थ्यांना लुटता येणार आहे. या स्मार्ट बोर्डचा वापर करुन शिक्षक विद्यार्थ्यांना नवीन गाणी, गोष्टी व अभ्यासासाठी पूरक माहिती देणार आहेत.

## प्राथमिक विभाग

### अभिनंदनीय

दि. १ जून २०२४ रोजी सौ. रेखा बाली यांच्याकडे पूर्व प्राथमिक व प्राथमिक विभागाचा प्रभारी मुख्याध्यापिका पदाचा कार्यभार सोपविण्यात आला. तसेच सौ. स्वाती महाजन आणि सौ. मनिषा नाईक यांच्यावर पूर्व प्राथमिक व प्राथमिक विभागाच्या पर्यवेक्षिका पदाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

### कब मास्तर व फ्लॉक लीडर प्राथमिक प्रशिक्षण

दि. ६ जून ते १२ जून २०२४ रोजी कालावधीत भारत स्काऊट्स ॲण्ड गाईड्सचे कब मास्तर व फ्लॉक लीडर प्राथमिक प्रशिक्षण शिबीर, सदाशिव पेठ, पुणे येथे आयोजित करण्यात आले होते. या प्रशिक्षण शिबिरात सौ. पल्लवी देशपांडे व श्रीमती सारिका करकंडे यांनी सहभाग घेतला आणि प्रशस्ती पत्रक प्राप्त केले.

### नवीन शैक्षणिक वर्षाची सुरुवात

दि. १५ जून २०२४ रोजी नियोजित वेळेत नवीन शैक्षणिक वर्षाची सुरुवात झाली. पूर्व प्राथमिक व प्राथमिक विभागाच्या प्रभारी मुख्याध्यापिका सौ. रेखा बाली यांनी विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक वर्षाच्या शुभेच्छा दिल्या.

## माध्यमिक विभाग

### अभिनंदनीय

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्चमाध्यमिक शिक्षण मंडळाने मार्च २०२४ मध्ये घेतलेल्या इ. १० परीक्षेचा निकाल १००% लागला.

एकूण प्रविष्ट विद्यार्थी - ३५७
एकूण उत्तीर्ण विद्यार्थी - ३५७

या परीक्षेत विद्यार्थ्यांनी अविस्मरणीय कामगिरी केली आहे. विशेष श्रेणीत २२५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून ६१ विद्यार्थ्यांनी ९०% पेक्षा अधिक गुण मिळविलेले आहेत. प्रथम श्रेणीमध्ये ११३ विद्यार्थी आणि द्वितीय श्रेणीत १९ विद्याथी उत्तीर्ण झाले आहेत.

प्रथम पाच क्रमांक प्राप्त विद्यार्थी हे १० वी अ या तुकडीमधील आहेत. त्यांची नावे पुढील प्रमाणे -

| विद्यार्थ्याचे नाव | शेकडा गुण | क्रमांक |
|---|---|---|
| कु. आभा अतुल बेणारे | ९८.८० | प्रथम |
| कु. समृध्दी आनंद वंजारे | ९७.६० | द्वितीय |
| कु. ओजस देवेंद्र ढेरे | ९७.४० | तृतीय |
| कु. गार्गी श्रीकांत जोशी | ९५.८० | चतुर्थ |
| कु. श्रुती अमोल काळगावकर | ९५.६० | पाचवी |

दि. ११ जून २०२४ रोजी या सर्व विद्यार्थ्यांसाठी आणि त्यांच्या पालकांसाठी कौतुक समारंभ आयोजित करण्यात आला होता. यावेळी इतर विद्यार्थ्यांनाही गुणपत्रिकांचे वाटप करण्यात आले.

**हिंदी राष्ट्रभाषा परीक्षा**

दि. १५ फेब्रुवारी २०२४ रोजी घेण्यात आलेल्या हिंदी राष्ट्रभाषा परीक्षेचा निकाल पुढील प्रमाणे

| | |
|---|---|
| एकूण प्रविष्ट विद्यार्थी | - २९ |
| प्रथम श्रेणी प्राप्त विद्यार्थी | - २५ |
| द्वितीय श्रेणी प्राप्त विद्यार्थी | - ४ |
| परीक्षेचा निकाल | - १०० % |

दि. ६ जून २०२४ रोजी इ. ७ वी ते इ. १० वी तसेच इ. ११ वी १२ वी च्या शिक्षकांना श्री. मंगेश खर्चे यांनी 'स्मार्ट बोर्ड' वापरण्याचे प्रशिक्षण दिले.

दि. ८ जून ते १७ जून २०२४ रोजी इ. ९ वी च्या २१ एन. सी. सी. एअर विंग कॅडेट्सनी सेनापती बापट रोड, पुणे येथे एकत्रित वार्षिक प्रशिक्षण शिबिरात सहभाग घेतला. या कॅडेट्सनी शिबिरात झालेल्या विविध स्पर्धांमध्ये सहभाग घेऊन यशस्वीरीत्या प्रशिक्षण पूर्ण केले आणि खालील बक्षिसे जिंकली.

| स्पर्धा | क्रमांक | बक्षीस |
|---|---|---|
| प्रश्न मंजुषा | प्रथम | स्मृतिचिन्ह |
| कवायत | द्वितीय | स्मृतिचिन्ह |
| सांस्कृतिक | द्वितीय | स्मृतिचिन्ह |

तसेच सर्वोत्कृष्ट कॅडेट श्रेणी जे. डी. साठी कॅडेट राजवीर जाधवराव आणि सर्वोत्कृष्ट कॅडेट जे. डब्ल्यू. साठी कॅडेट वेदांती कदम यांची निवड करण्यात आली. संपूर्ण एअरविंगच्या तुकडीला थर्ड ऑफिसर श्रुती कांबळे यांनी प्रशिक्षण व मार्गदर्शन केले.

दि. ४ मे ते १५ मे २०२४ या कालावधीत एन. सी. सी. एअर विंग ग्रुप कोईम्बतूरद्वारे निलगिरीमध्ये दहा दिवसीय अखिल भारतीय एन. सी. सी. मुलींची ट्रेकिंग मोहिम २०२४ तामिळनाडू ट्रेक आयोजित करण्यात आली होती. यामध्ये कॅडेट इरा जोशी, कॅडेट आर्या चोरमले, कॅडेट शर्वरी जगताप या तीन कॅडेट्सनी सहभाग घेतला.

**अभिनंदनीय**

✲ शिक्षिका सौ. निशू सरिया यांनी अंकशास्त्र या विषयातील प्रमाणपत्र अभ्यासक्रम यशस्वीरित्या पूर्ण केला.

✲ दि. २२ मे ते दि.२६ मे २०२४ रोजी बालेवाडी, पुणे येथे झालेल्या राष्ट्रीय किकबॉक्सिंग स्पर्धेत इ. ८ वी इ मधील विद्यार्थी कु. ऑस्टीन नवगिरे याने सुवर्णपदक मिळविले.

✲ दि. ५ जून ०२४ रोजी माध्यमिक विभागातील शिक्षिका सौ. जयती नरवणे यांच्यावर पर्यवेक्षिका पदाची जबाबदारी सोपविण्यात आली.

## उच्च माध्यमिक विभाग

**अभिनंदनीय**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्चमाध्यमिक शिक्षण मंडळाने मार्च २०२४ मध्ये घेतलेल्या इ. १२ परीक्षेचा निकाल दि. २१ मे २०२४ रोजी जाहीर झाला. या वर्षी विभागाचा निकाल ९७.८७ % इतका लागला. प्रथम तीन क्रमांक प्राप्त विद्यार्थी पुढील प्रमाणे

| विद्यार्थ्याचे नाव | शेकडा गुण | क्रमांक |
|---|---|---|
| कु. ईशा संतोष शेळके | ८९.६७ | प्रथम |
| कु. अद्वैत भूषण केळकर | ८९.५० | द्वितीय |
| कु. आयुष सचिन चिटणीस | ८६.३३ | तृतीय |

**सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेच्या वतीने हार्दिक अभिनंदन आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा !** ✲

**दुरुस्ती समाचार माहे नोव्हेंबर २०२३ पृष्ठ क्र. १५**



श्री. विलास रानडे

✲ संस्थेचे माजी विद्यार्थी श्री. विलास रानडे आणि उद्योजक श्री. प्रसाद व सौ. योगिनी हिराळकर यांनी दिलेल्या देणगी रकमेतून मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागामध्ये 'स्मार्ट बोर्ड' घेण्यात आले. खंडेनवमीच्या दिवशी या स्मार्ट बोर्डचे उद्घाटन करण्यात आले. सदर देणगी मिळविण्यासाठी विभागप्रमुख डॉ. मनमोहन भूमकर यांनी विशेष प्रयत्न केले. ✲

## मुक्तांगण इंग्लिश स्कूल आणि कनिष्ठ महाविद्यालय, पुणे ९

### माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा २०२४ प्रथम पाच क्रमांक प्राप्त विद्यार्थी



कु. आभा बेणारे
९८.८०%
प्रथम



कु. समृध्दी वंजारे
९७.६०%
द्वितीय



कु. ओजस ढेरे
९७.४०%
तृतीय



कु. गार्गी जोशी
९५.८०%
चतुर्थ



कु. श्रुती काळगावकर
९५.६०%
पाचवी



पुणे शहर भारत स्काऊट गाईड स्थानिक संस्थेद्वारे आयोजित केलेल्या सात दिवसीय प्राथमिक प्रशिक्षण शिबिरामध्ये पूर्व प्राथमिक विभागातील सौ. दिपाली पाध्ये, सौ. सोनल काणे यांनी बनी टमटोला, प्राथमिक विभागातील श्री. बलराज शोभणे यांनी कब लीडर आणि श्रीमती सारिका करकंडे, सौ. पल्लवी देशपांडे यांनी फ्लॉक लीडर प्रशिक्षणामध्ये सहभाग घेतला.



प्राचार्या सौ. मीना राणे, पर्यवेक्षिका सौ. सायली धाक्रस, सौ. सुप्रिया देशकुलकर्णी, सौ. जयती नरवणे आणि मार्गदर्शिका श्रुती कांबळे यांच्यासमवेत इयत्ता नववीच्या एन.सी.सी.एअर विंग कॅडेट्स विविध स्पर्धांमध्ये मिळविलेल्या बक्षिसांसह

## विद्याभवन-घाटकोपर, मुंबई शाखा

### विद्याभवन पूर्व प्राथमिक सेमी इंग्रजी
### विद्याभवन पूर्व प्राथमिक इंग्रजी

**कार्यवाह : श्री. राजेंद्र वि. बोऱ्हाडे**
**पर्यवेक्षिका : सौ. सिध्दी साळवी (सेमी इंग्रजी),**
**पर्यवेक्षिका : सौ. पूजा फरिया (इंग्रजी माध्यम)**

**शाळेचा पहिला दिवस**

सोमवार दि. १० जून २०२४ रोजी पूर्व प्राथमिक सेमी इंग्रजी आणि इंग्रजी माध्यमाचा छोटा शिशु वर्ग सुरु करण्यात आला. हा दिवस उत्साही व संमिश्र भावनांचा होता. नवीन विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी शाळेच्या मुख्य द्वारावर फुग्यांची सजावट केली होती. तसेच वर्गामध्ये ही फुगे, मिकी माऊस, भीम व शैक्षणिक साहित्याद्वारे सजावट करण्यात आली होती. मुलांचे आगमन होताच, शिक्षकांनी मोठया उत्साहाने त्यांचे स्वागत केले. मुलांपैकी काही जणांनी हसऱ्या तर काही मुलांनी रडक्या चेहऱ्यांनी शाळेत पदार्पण केले. त्यांच्या आगमनाने शाळेला नवीन चैतन्य प्राप्त झाले होते. विद्यार्थ्यांच्या करमणुकीसाठी शिक्षकांनी गाणी लावली होती. तसेच मुलांनी घसरगुंडी व सी-सॉ खेळण्याचा आनंद घेतला. विद्यार्थ्यांना वेफर्स, बिस्कीटे व लॉलीपॉप देण्यात आले. घरी जाताना विद्यार्थ्यांनी व पालकांनी सजवलेल्या सेल्फी पॉईंट वर छान सेल्फी काढल्या.

### विद्याभवन प्राथमिक इंग्रजी
### विद्याभवन प्राथमिक मराठी

**कार्याध्यक्ष : श्री. राजेंद्र वि. बोऱ्हाडे**
**मुख्याध्यापिका : श्रीमती अनघा संतोष सावंत**
**मुख्याध्यापक : श्री. गणेश कणसे**

**१५ जून २०२४ प्रवेशोत्सव**

ङ्क'आवडते मज मनापासुनी शाळा, लाविते लळा ही जसा माऊली बाळा.'' पहिल्या पावसाची सर आणि मग मातीचा येणारा खरपूस वास, तसेच शाळेत आल्यानंतर विद्यार्थ्यांचा जल्लोषात प्रवेशोत्सव आणि त्यांना सर्व शिक्षा अभियान अंतर्गत मिळणाऱ्या पुस्तकांमधून येणारा एक वेगळाच सुवास या सगळ्यांचे समीकरण घडून आले आज विद्याभवन प्राथमिक इंग्रजी व मराठी विभागात.

विद्यार्थ्यांचे औक्षण, गुलाबपुष्प देऊन स्वागत आणि वर्गातही मनसोक्त खेळण्याचा कार्यक्रम, खाऊची रेलचेल. त्यात प्रथमच शाळेत आलेल्या पहिलीच्या चिमुरड्यांना आपल्या आई-बाबांचे गोड आणि काळजीवाहू हास्य खुणावत होते. छोट्या विद्यार्थ्यांचा रडवेला चेहरा आणि सभोवतालची गंमत दाखवण्याची धडपड करत पालकांनी आपल्या चिमुकल्यांना शिक्षकांच्या हाती सोपवले व आपला सेल्फी देखील त्यांच्याबरोबर काढून घेतला. विद्याभवन परिसरातील पहिल्या दिवशीचे असे आनंदी, उत्साही वातावरण. उन्हाळयाच्या सुट्टीनंतर शनिवार अर्धा दिवस असूनही शाळेची पहिली घंटा वाजली आणि ओसंडून वाहणाऱ्या शालेय बस मधून एकच गलका ऐकू आला. अरे आपली शाळा!!!

### विद्याभवन माध्यमिक मराठी व कनिष्ठ महाविद्यालय, विद्याभवन हायस्कूल नं.२,

**कार्याध्यक्ष : श्री. राजेंद्र वि. बोऱ्हाडे**
**मुख्याध्यापिका : श्रीमती योगिनी रा. पोतदार (मराठी)**
**मुख्याध्यापक : श्री. सुनिल पाटील (इंग्रजी)**

**विद्याभवन हायस्कूल व माध्यमिक मराठी एस.एस.सी मार्च २०२४ निकाल**

मार्च २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेचा शालेय निकाल १००% लागला. विद्याभवन शाळेने आपल्या उज्ज्वल यशाची परंपरा कायम राखली. या परीक्षेस एकूण १४६ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. ९४ विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य मिळविले, ३८ विद्यार्थी प्रथम श्रेणीत, तर द्वितीय श्रेणी

१४ विद्यार्थ्यांनी प्राप्त केली.

**गुणानुक्रमे पहिले तीन विद्यार्थी खालील प्रमाणे -**

| विद्यार्थ्याचे नाव | गुण ५०० पैकी | शेकडा गुण |
|---|---|---|
| कु. कोमल तुषार तोत्रे | ४७३ | ९४.६० |
| कु. देवांग अशोक नरावडे | ४७१ | ९४.२० |
| कु. सायली दत्तु सहाणे | ४६६ | ९३.२० |

**विषयनिहाय प्रथम आलेले विद्यार्थी पुढील प्रमाणे -**

| विषय | विद्यार्थ्याचे नाव | गुण १०० पैकी |
|---|---|---|
| मराठी | कु. सायली दत्तु सहाणे | ९७ |
| हिंदी | कु. साक्षी मारुती सानप | ९५ |
| इंग्लिश | कु. कोमल तुषार तोत्रे | ९४ |
| | कु. सायली दत्तु सहाणे | -''- |
| | कु. मेघा महेंद्र महाबळे | -''- |
| | कु. गौरी अनिल ठोंबरे | -''- |
| | कु. स्नेहल अरुण माने | -''- |
| | कु. विनायक बाळकृष्ण घागरे | -''- |
| गणित | कु. सक्षम राजेश वाघ | ९५ |
| विज्ञान | कु. देवांग अशोक नरावडे | ९७ |
| समाजशास्त्र | कु. श्रावणी गणेश हिंगणे | ९७ |

**विद्याभवन हायस्कूल नं. २ एस. एस. सी मार्च २०२४ निकाल**

'महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ' मार्फत आयोजित मार्च २०२४ माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षेस विद्याभवन हायस्कूल नं. २ इंग्रजी माध्यमातून एकूण २२० विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. त्यापैकी २२० उत्तीर्ण झाले. या वर्षी १००% निकाल लागला व १५२ विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य मिळविले, ५८ विद्यार्थी प्रथम श्रेणी तर द्वितीय श्रेणी १० विद्यार्थ्यांनी प्राप्त केली.

**गुणानुक्रमे पहिले तीन विद्यार्थी खालील प्रमाणे -**

| विद्यार्थ्याचे नाव | गुण ५०० पैकी | शेकडा गुण |
|---|---|---|
| कु. अदिती देविदास घांगळे | ४८५ | ९७.०० |
| कु. तनिष्का संतोष चव्हाण | ४८२ | ९६.४० |
| कु. संस्कृती रविंद्र घोलप | ४८२ | ९६.४० |
| कु. श्रेया सुभाष भातुसे | ४७५ | ९६.०० |
| कु. अनुष्का संदीप गाढवे | ४७५ | ९६.०० |

**विषयनिहाय प्रथम आलेले विद्यार्थी पुढील प्रमाणे -**

| विषय | विद्यार्थ्याचे नाव | गुण १०० पैकी |
|---|---|---|
| इंग्लिश | कु. इशिता उमेश जोशी | ९५ |
| मराठी | कु. तनिष्का संतोष चव्हाण | ९४ |
| | कु. अर्णव प्रविण भोर | ९४ |
| | कु. विश्वम् श्रीकांत जाधव | -''- |
| | कु. प्रवरा संजय महाडिक | -''- |
| | कु. शलाका राजू मुदगे | -''- |
| | कु. मधुरा महेश पिसाळ | -''- |
| | कु. अथर्व राजेंद्र लांबे | -''- |
| | कु. सोहम ज्ञानेश्वर जाधव | -''- |
| | कु. पर्णवी राजेश तुळसकर | -''- |
| संस्कृत | कु. अदिती देविदास घांगळे | ९९ |
| | कु. संस्कृती रविंद्र घोलप | -''- |
| | कु. तनिष्का संतोष चव्हाण | -''- |
| | कु. अनुष्का संदीप गाढवे | -''- |
| | कु. तक्ष राजेश मोराबिया | -''- |
| | कु. इशिता उमेश जोशी | -''- |
| हिंदी | कु. श्रावणी राजू हेगडे | ९३ |
| | कु. तृषिता लक्ष्मण माळवी | -''- |
| गणित | कु. संस्कृती रविंद्र घोलप | ९८ |
| विज्ञान | कु. मीत योगेश गिरी | ९७ |
| | कु. आदित्य ईश्वर ध्याडे | -''- |
| | कु. तक्ष राजेश मोराबिया | -''- |
| | कु. मयंक योगेश गिरी | -''- |

| | | |
|---|---|---|
| समाजशास्त्र | कु. अदिती देविदास घांगळे | ९८ |
| | कु. अनुष्का संदीप गाढवे | -''- |
| | कु. आदित्य ईश्वर ध्याडे | -''- |
| | कु. श्रध्दा दयानंद सुतार | -''- |

**विद्याभवन हायस्कूल नं. २ (मराठी माध्यम) एस.एस.सी मार्च २०२४ निकाल**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ मार्फत आयोजित मार्च २०२४ माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षेस विद्याभवन हायस्कूल नं. २ मराठी माध्यमातून एकूण ५१ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. या वर्षी ९८.०४% निकाल लागला. एकूण निकालात विशेष योग्यता श्रेणी १४ व प्रथम श्रेणी २१ तर द्वितीय श्रेणी १२ विद्यार्थ्यांनी प्राप्त केली तर ०३ विद्यार्थी तृतीय श्रेणीत उत्तीर्ण झाले.

**गुणानुक्रमे पहिले तीन विद्यार्थी खालील प्रमाणे -**

| विद्यार्थ्याचे नाव | गुण ५०० पैकी | शेकडा गुण |
|---|---|---|
| कु. दिशु विजय इंगळे | ४४२ | ८८.४० |
| कु. अथर्व गोविंद दातीर | ४३९ | ८७.८० |
| कु. हर्षल शांताराम बावधाने | ४३८ | ८७.६० |

**विषयनिहाय प्रथम आलेले विद्यार्थी पुढील प्रमाणे -**

| विषय | विद्यार्थ्याचे नाव | गुण १०० पैकी |
|---|---|---|
| मराठी | कु. हर्षल शांताराम बावधाने | ९४ |
| हिंदी | कु. हर्षल शांताराम बावधाने | ८९ |
| इंग्लिश | कु. दिशु विजय इंगळे | ९२ |
| गणित | कु. हर्षल शांताराम बावधाने | ८७ |
| विज्ञान | कु. तेजश्री रमेश पोंदे | ८८ |
| समाजशास्त्र | कु. दिशु विजय इंगळे | ९१ |

**उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा २०२४ विज्ञान शाखा निकाल :**

शैक्षणिक वर्ष फेब्रुवारी-मार्च २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेला विद्याभवन कनिष्ठ महाविद्यालय विज्ञान शाखेतून एकूण २३२ विद्यार्थी प्रविष्ट झाले. त्यापैकी २२८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. ५ विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य मिळविले, ४७ विद्यार्थ्यांनी प्रथम श्रेणी तर द्वितीय श्रेणी १२६ विद्यार्थ्यांनी प्राप्त केली. विज्ञान शाखेचा एकूण निकाल ९८.२७% लागला.

**गुणानुक्रमे पहिले तीन विद्यार्थी पुढील प्रमाणे :**

| विद्यार्थ्याचे नाव | गुण ६०० पैकी | शेकडा गुण |
|---|---|---|
| कु. अलोकनाथ बिश्वनाथ साहू | ४९१ | ८१.८३ |
| कु. किशन संन्यासी गुजुरी | ४५३ | ७५.५० |
| कु. वैभव सत्यदेव मिश्रा | ४२८ | ७१.३३ |

**विज्ञान (अंशतः) विनाअनुदानित शाखा (द्विलक्षी अभ्यासक्रम)**

शैक्षणिक वर्ष २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेला विज्ञान विनाअनुदानित शाखेतून एकूण ४७ विद्यार्थी प्रविष्ट झाले. त्यापैकी ४६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. ३ विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य मिळविले. १६ विद्यार्थ्यांनी प्रथम श्रेणी तर द्वितीय श्रेणी १३ विद्यार्थ्यांनी प्राप्त केली. विज्ञान विनाअनुदानित शाखेचा एकूण निकाल ९७.८७% लागला.

**गुणानुक्रमे पहिले तीन विद्यार्थी पुढील प्रमाणे -**

| विद्यार्थ्याचे नाव | गुण ६०० पैकी | शेकडा गुण |
|---|---|---|
| कु. केदार मंगेश सावंत | ४९५ | ८२.५० |
| कु. हिमांशु राजेश कातरनवरे | ४९३ | ८२.१७ |
| कु. पार्थ दीपक डोके | ४५४ | ७५.६७ |

**विषयनिहाय प्रथम आलेले विद्यार्थी पुढील प्रमाणे -**

| विषय | विद्यार्थ्याचे नाव | गुण १०० पैकी |
|---|---|---|
| इंग्रजी | कु. तन्मय गिरीश भूवड | ८३ |
| मराठी | कु. मयुरेश संतोष कदम | ९१ |
| गणित | कु. केदार मंगेश सावंत | ९४ |
| हिंदी | कु. हर्षिता गोपीचंद घेगडमल | ८९ |
| भौतिकशास्त्र | कु. केदार मंगेश सावंत | ८६ |
| रसायनशास्त्र | कु. केदार मंगेश सावंत | ८४ |
| | कु. अलोकनाथ बिश्वनाथ साहू | ८४ |

| | | |
|---|---|---|
| जीवशास्त्र | प्राची क्रिष्णा शिंदे | ८४ |
| | | **गुण २०० पैकी** |
| इलेक्ट्रॉनिक्स | हिमांशु राजेश कातरनवरे | १६९ |
| कॉम्प्युटर सायन्स | तन्मय बाबुराव पानसरे | १८६ |

### उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा निकाल २०२४ : विद्याभवन वाणिज्य शाखा

शैक्षणिक वर्ष २०२४ उच्च माध्यमिक प्रमाणपत्र फेब्रुवारी-मार्च २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या परीक्षेस वाणिज्य स्वयंअर्थसहाय्यित शाखेतून एकूण ७७ विद्यार्थी प्रविष्ट झाले. त्यापैकी ७६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. १५ विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य मिळविले. तर २५ प्रथम श्रेणी तर द्वितीय श्रेणी २७ विद्यार्थ्यांनी प्राप्त केली. वाणिज्य शाखेचा निकाल ९८.७०% लागला.

**गुणानुक्रमे पहिले तीन विद्यार्थी पुढील प्रमाणे :**

| विद्यार्थ्याचे नाव | गुण ६०० पैकी | शेकडा गुण |
|---|---|---|
| कु. समिक्षा संजय सोनावणे | ५२२ | ८७.०० |
| कु. श्लोक सतिश गुरव | ५०४ | ८४.०० |
| कु. साक्षी प्रविण भोसले | ५०१ | ८३.५० |

**विषयनिहाय प्रथम आलेले विद्यार्थी पुढील प्रमाणे -**

| विषय | विद्यार्थ्याचे नाव | गुण १०० पैकी |
|---|---|---|
| इंग्रजी | कु. साक्षी प्रविण भोसले | ८५ |
| हिंदी | कु. सानिका हरिश्चंद्र मयेकर | ८६ |
| | कु. यशश्री रामदास मोरे | -''- |
| मराठी | कु. सुप्रिया प्रदीप सावंत | ८७ |
| एस.पी | कु. समिक्षा संजय सोनावणे | ९० |
| ओ.सी | कु. समिक्षा संजय सोनावणे | ९१ |
| बी.के | कु. श्लोक सतिश गुरव | ९५ |
| अर्थशास्त्र | कु. श्लोक सतिश गुरव | ९१ |

### १५ जून २०२४ प्रवेशोत्सव

शनिवार दि. १५ जून २०२४ रोजी सकाळी ७.०० वाजता शालेय प्रांगणात प्रवेशोत्सवासाठी शिक्षक, पालक व विद्यार्थी यांची एकच गर्दी जमली होती. शालेय प्रवेशद्वार फुगे व फुलांनी सजविण्यात आले होते आणि सुंदर असे वेलकमचे फलक रंगविण्यात आले होते. मुलांमध्ये शाळेच्या पहिल्या दिवसाचा खूप उत्साह दिसून आला. माध्यमिक मराठीच्या मुख्याध्यापिका श्रीमती योगिनी पोतदार यांनी सर्व विद्यार्थ्यांचे स्वागत केले तसेच शाळा संदर्भात काही आवश्यक सूचना दिल्या. इंग्रजी माध्यमाचे मुख्याध्यापक श्री. सुनिल पाटील यांनी इ. ५वी ते १०वी तील सर्व विद्यार्थ्यांना २०२४-२५ या नवीन शैक्षणिक वर्षाच्या शुभेच्छा दिल्या तसेच अभ्यास, शिस्त व समयपालनाबाबत मोलाचे मार्गदर्शन केले. उपमुख्याध्यापिका श्रीमती लता नायर, समन्वयिका श्रीमती सरला नरेंद्रन् तसेच सर्व शिक्षकांनी विद्यार्थ्यांना गुलाबपुष्प देऊन पुस्तकांचे वाटप केले. सर्व शाळेचे आवार विद्यार्थी किलबिलाटाने गजबजून गेले होते.

### गुरुवर्य अण्णासाहेब खैर जयंती

दि. १५.६.२०२४ रोजी प्रशालेच्या आप्पासाहेब गरगटे सभागृहात डॉ. अण्णासाहेब खैर जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाचे पाहुणे म्हणून माजी विद्यार्थी मंडळाचे अध्यक्ष डॉ. बा. गो. कुलकर्णी, सचिव श्री. तुकाराम दौंडकर आणि कोषाध्यक्ष श्री. प्रकाश सादमे होते. मुख्याध्यापिका श्रीमती योगिनी पोतदार यांनी पाहुण्यांचे स्वागत पुष्प देऊन केले. माजी विद्यार्थी कु. कोमल तुषार तोत्रे या विद्यार्थिनीने अण्णांच्या कार्याबद्दल आपले विचार व्यक्त केले. पाहुणे डॉ. बा. गो. कुलकर्णी यांनी अण्णांच्या आठवणी आपल्या भाषणातून व्यक्त केल्या. माजी विद्यार्थी मंडळाचे कोषाध्यक्ष श्री. प्रकाश सादमे यांनी अण्णांचे जीवन चरित्र विद्यार्थ्यांसमोर मांडले.

कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांना पाहुण्यांच्या हस्ते शालेय पुस्तकांचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमास प्रशालेच्या मुख्याध्यापिका श्रीमती योगिनी पोतदार,

उपमुख्याध्यापिका श्रीमती ज्योती देसाई, इंग्रजी माध्यमाचे मुख्याध्यापक श्री. सुनिल पाटील, उपमुख्याध्यापिका श्रीमती लता नायर, समन्वयिका श्रीमती सरला नरेंद्रन् तसेच कॉलेजचे प्राचार्य डॉ. अजयकुमार पाठक उपस्थित होते.

कार्यक्रमाची सांगता आभार प्रदर्शनाने झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहा.शिक्षक श्री. पद्माकर शिंगटे यांनी केले.

***

**✻ विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, घाटकोपर शाखा, मुंबई ✻**

**माध्यमिक मराठी एस. एस. सी. मार्च २०२४ प्रथम तीन क्रमांक प्राप्त विद्यार्थी**



कु. कोमल तुषार तोत्रे
९४.६०% - प्रथम



कु. देवांग नरावडे
९४.२०% - द्वितीय



कु. सायली दत्तु सहाणे
९३.२०% - तृतीय

**उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी २०२४ प्रथम तीन क्रमांक प्राप्त विद्यार्थी**



कु. अलोकनाथ बिश्वनाथ साहू
८१.८३% - प्रथम



कु. किशन संन्यासी गुजुरी
७५.५०% - द्वितीय



कु. वैभव सत्यदेव मिश्रा
७१.३३% - तृतीय

**विद्याभवन कनिष्ठ महाविद्यालय विज्ञान अंशतः अनुदानित शाखा (द्विलक्षी अभ्यासक्रम)**

**उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा २०२४ प्रथम तीन क्रमांक प्राप्त विद्यार्थी**



कु. केदार मंगेश सावंत
८२.५०% - प्रथम



कु. हिमांशु राजेश कातरनवरे
८२.१७% - द्वितीय



कु. पार्थ दीपक डोके
७५.६७% - तृतीय

## विद्याभवन वाणिज्य शाखा उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा २०२४
## प्रथम तीन क्रमांक प्राप्त विद्यार्थी


कु. समिक्षा संजय सोनावणे
८७.००% - प्रथम


कु. श्लोक सतिश गुरव
८४.००% - द्वितीय


कु. साक्षी प्रविण भोसले
८३.५०% - तृतीय

## विद्याभवन हायस्कूल नं. २ एस. एस. सी. मार्च २०२४ प्रथम तीन क्रमांक प्राप्त विद्यार्थी


कु. अदिती देविदास घांगळे
९७.००% - प्रथम


कु. तनिष्का संतोष चव्हाण
९६.४०% - द्वितीय


कु. संस्कृती रविंद्र घोलप
९६.४०% - द्वितीय


कु. श्रेया सुभाष भातुसे
९६.००% - तृतीय


कु. अनुष्का संदीप गाढवे
९६.००% - तृतीय

## विद्याभवन हायस्कूल नं. २ (मराठी माध्यम) एस. एस. सी. मार्च २०२४
## प्रथम तीन क्रमांक प्राप्त विद्यार्थी


कु. दिशु विजय इंगळे
८८.४०% - प्रथम


कु. अथर्व गोविंद दातिर
८७.८०% - द्वितीय


कु. हर्षल शांताराम बावधाने
८७.६०% - तृतीय

## ✻ विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, घाटकोपर शाखा, मुंबई ✻



पूर्व प्राथमिक मराठी विभाग - शाळेचा पहिला दिवस साजरा करताना विद्यार्थी व शिक्षिका



शाळा प्रवेशोत्सव दिनी विद्यार्थ्यांचे औक्षण करुन स्वागत करताना प्राथमिक मराठी विभागाच्या शिक्षिका



शाळा प्रवेशोत्सव दिनी विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके वाटप करताना मुख्याध्यापक श्री. गणेश कणसे




शाळा प्रवेशोत्सव दिनी विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत करताना मुख्याध्यापिका श्रीमती योगिनी पोतदार



माध्यमिक शालांत परीक्षेत प्रशालेत प्रथम क्रमांक प्राप्त करणारी विद्यार्थिनी कु. कोमल तोत्रे हिचे अभिनंदन करताना माजी विद्यार्थी मंडळाचे अध्यक्ष डॉ. बा. गो. कुलकर्णी, श्री. तु. अ. दौंडकर, मुख्याध्यापिका श्रीमती योगिनी पोतदार आणि समन्वयिका श्रीमती सरला नरेंद्रन

## विद्याप्रशाला हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय

### तळेगाव अंजनेरी शाखा, नाशिक

**संचालक : श्री. अमोल म. जोशी**

**मुख्याध्यापक : श्री. शरद कोठावदे**

**शाखा वर्धापन दिन**

दि. १४ जून २०२४ रोजी तळेगाव शाखेचा ४३ वा वर्धापन दिन उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी मुख्याध्यापक श्री. शरद कोठावदे व पर्यवेक्षक श्री. संजय जोशी यांनी संस्थेचे संस्थापक कुलगुरू कै. दादासाहेब केतकर व कै. अण्णासाहेब खैर यांच्या प्रतिमांचे पूजन केले.

उपशिक्षक श्री. चेतन गोऱ्हे यांनी विद्यालयाच्या स्थापनेपासून आत्तापर्यंतच्या प्रगतीचा प्रवास उलगडला. यावेळी बोलताना पर्यवेक्षक श्री. संजय जोशी यांनी इ. १० वी व १२ वी निकालाबाबत सर्व शिक्षकांचे अभिनंदन केले. विद्यालयात नविन विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रक्रियेबाबत मार्गदर्शन केले. यावेळी उपशिक्षक श्री. साहेबराव ठोंबरे यांचा मुलगा चि. अविष्कार व उपशिक्षिका श्रीमती मोहिनी पंगुडवाले यांची कन्या कु. मधुरा यांनी इ.१२ वी परीक्षेत मिळविलेल्या यशाबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक श्री. शरद कोठावदे यांनी विद्यालयाच्या प्रगतीसाठी सर्वांनी एकजुटीने काम करण्याचे आवाहन केले. प्रास्ताविक श्री. प्रकाश गवळी यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती प्रीती राजपूत व आभार प्रदर्शन श्रीमती रक्षा शिवदे यांनी केले.

**प्रवेशोत्सव**

दि. १५ जून २०२४ रोजी नव्या शैक्षणिक वर्षाच्या सुरूवातीला सर्व विद्यार्थ्यांना गुलाब पुष्प व चॉकलेट देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले. विद्यार्थ्यांवर पुष्पवृष्टी करून त्यांचा प्रवेशोत्सव साजरा करण्यात आला.

सदर कार्यक्रम प्रसंगी समग्र शिक्षा अभियानांतर्गत मोफत मिळणाऱ्या पाठ्यपुस्तकांचे मुख्याध्यापक श्री. शरद कोठावदे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आले. आपल्या अध्यक्षीय मनोगतातून त्यांनी सर्व विद्यार्थी व शिक्षकांना नवीन शैक्षणिक वर्षासाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्र संचालन ग्रंथपाल सौ. अर्चना गीत यांनी केले.

**गुरुवर्य डॉ. अण्णासाहेब खैर जयंती**

दि. १५ जून २०२४ रोजी गुरुवर्य डॉ. अण्णासाहेब खैर यांची जयंती विद्यालयात साजरी करण्यात आली. याप्रसंगी मुख्याध्यापक श्री. शरद कोठावदे यांनी कै. डॉ. अण्णासाहेब खैर यांच्या प्रतिमेचे पूजन केले. श्रीमती प्रीती राजपूत यांनी कै. अण्णांच्या जीवनातील विविध प्रसंग सांगून त्यांचा जीवनपट उलगडला व संस्था विकासासाठी त्यांनी केलेल्या कार्याची माहिति उपस्थितांना करून दिली.

**उच्च माध्यमिक विभाग कला शाखा २०२३ - २४ निकाल**

प्रविष्ट विद्यार्थी - १३५
उत्तीर्ण विद्यार्थी - १२४
शेकडा निकाल - ९१.८५

| विद्यार्थ्याचे नाव | शेकडा गुण | क्रमांक |
|---|---|---|
| कु. श्वेता दशरथ जाधव | ७८.३३ | प्रथम |
| कु. दीक्षा अशोक रहाडे | ७५.३३ | द्वितीय |
| कु. सचिन भाऊसाहेब लहांगे | ७५.२२ | तृतीय |

**माध्यमिक विभाग २०२३- २४ निकाल**

प्रविष्ट विद्यार्थी - १४५
उत्तीर्ण विद्यार्थी - १३७
शेकडा निकाल - ९४.४८

| विद्यार्थ्याचे नाव | शेकडा गुण | क्रमांक |
|---|---|---|
| कु. गायत्री संपत मोरे | ८७.२० | प्रथम |
| कु. साक्षी राजाराम महाले | ८५.२० | द्वितीय |
| कु. वेदांती गोपाळ पगार | ८४.४० | तृतीय |

**सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेच्या वतीने हार्दिक अभिनंदन !**

***

## ※ विद्या प्रशाला हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, तळेगाव (अं.), नाशिक ※

### उच्च माध्यमिक विभाग (इ. १२ वी) कला शाखा २०२३ – २४ निकाल



कु. श्वेता दशरथ जाधव
७८.३३%
प्रथम क्रमांक




कु. दीक्षा अशोक रहाडे
७५.३३%
द्वितीय क्रमांक



कु. सचिन भाऊसाहेब लहांगे
७५.३३%
द्वितीय क्रमांक

### माध्यमिक विभाग (इ. १० वी) २०२३ – २४ निकाल



कु. गायत्री संपत मोरे
८७.२०%
प्रथम क्रमांक



कु. साक्षी राजाराम महाले
८५.२०%
द्वितीय क्रमांक



कु. वेदांती गोपाळ पगार
८४.४०%
तृतीय क्रमांक



दि. १४ जून २०२४ रोजी
तळेगाव शाखेच्या ४३ व्या वर्धापन दिन प्रसंगी
कुलगुरू कै. दादासाहेब केतकर व कै. अण्णासाहेब खैर
यांच्या प्रतिमांचे पूजन करताना
मुख्याध्यापक श्री. शरद कोठावदे
आणि पर्यवेक्षक श्री. संजय जोशी



दि. १५ जून २०२४ रोजी
शिक्षणमहर्षी कै. अण्णासाहेब खैर यांच्या जयंतीनिमित्त
कै. डॉ. अण्णांच्या प्रतिमेचे पूजन करताना
मुख्याध्यापक श्री. शरद कोठावदे
व श्री. सुकदेव निंबेकर

# डॉ. काकासाहेब देवधर इंग्लिश स्कूल,म्हसरूळ–नाशिक

**कार्यवाह : श्री. संजय गुंजाळ**
**मुख्याध्यापिका : श्रीमती भारती पाटील**

**शैक्षणिक वर्ष २०२३ - २४ मधील शालान्त परीक्षेत माध्यमिक व उच्चमाध्यमिक परीक्षा निकाल**

शैक्षणिक वर्ष २०२३ - २४ मधील शालान्त परीक्षेत माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागाने घवघवीत यश संपादन केले. माहे मार्चमध्ये झालेल्या महाराष्ट्र राज्य माध्यमिक विभागाचा शालेय निकाल १००% लागला. उच्च माध्यमिक विभागाचा विज्ञान शाखेचा निकाल ९८.४६% लागला. तसेच वाणिज्य शाखेचा ८९.०९% लागला. माध्यमिक विभागाचे शालान्त परीक्षेस एकूण १३३ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. उच्च माध्यमिक विभागाचे विज्ञान व वाणिज्य शाखेचे एकूण १२० विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागातील प्रथम तीन क्रमांक प्राप्त विद्यार्थी पुढील प्रमाणे

**माध्यमिक विभाग**

| विद्यार्थ्याचे नाव | प्राप्त गुण | क्रमांक |
|---|---|---|
| कु. सोहम पवार | ९७.०० | प्रथम |
| कु. मयंक भामरे | ९६.०० | द्वितीय |
| कु. तन्मय पाटील | ९५.०८ | तृतीय |

**उच्च माध्यमिक विभाग - विज्ञान शाखा**

| | | |
|---|---|---|
| कु. पायल कुमावत | ७५.५० | प्रथम |
| कु. दीक्षा ठाकरे | ७२.५० | द्वितीय |
| कु. शुभांगी जैस्वाल | ६९.३३ | तृतीय |

**उच्च माध्यमिक विभाग - वाणिज्य शाखा**

| | | |
|---|---|---|
| कु. अमित सरोदे | ८९.८३ | प्रथम |
| कु. श्रीम पुरोहित | ८५.६७ | द्वितीय |
| कु. अक्षदा काकड | ८०.३३ | तृतीय |

**सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेच्या वतीने हार्दिक अभिनंदन आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा !** ***

**✻ डॉ. काकासाहेब देवधर इंग्लिश स्कूल,म्हसरूळ–नाशिक ✻**



माध्यमिक विभागातील यशस्वी विद्यार्थ्यांसमवेत कार्यवाह श्री. संजय गुंजाळ मुख्याध्यापिका श्रीमती भारती पाटील आणि मार्गदर्शक शिक्षिका



उच्च माध्यमिक विभागातील यशस्वी विद्यार्थ्यांसमवेत कार्यवाह श्री. संजय गुंजाळ मुख्याध्यापिका श्रीमती भारती पाटील आणि मार्गदर्शक शिक्षक वर्ग

## कॉलेज ऑफ सायन्स ॲण्ड कॉमर्स, पुणे

**संचालक : डॉ. राजेंद्र सं. कांबळे**
**प्राचार्य : डॉ. संजयकुमार गायकवाड**

### जागतिक पर्यावरण दिन

दि. ५ जून २०२४ रोजी ''वृक्षारोपण करा, वसुंधरा वाचवा'' असा संदेश देत जागतिक पर्यावरण दिन, वृक्षारोपण करून साजरा करण्यात आला. जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून वृक्षारोपण करण्यात आले. आपल्या पृथ्वीवर पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी वृक्षांचे महत्त्व अत्यंत मोलाचे आहे. झाडे केवळ आपल्या जीवनाच्या गरजांसाठीच महत्त्वाची नाहीत, तर ती आपल्या आरोग्यासाठी आणि पर्यावरणासाठी ही अत्यंत आवश्यक आहेत. वृक्ष आपणास प्राणवायू पुरवतात, हवेतील प्रदूषण कमी करतात आणि जलसंधारणात मदत करतात. झाडांमुळे आपल्या परिसरातील पर्यावरण सुधारेल, जैवविविधता वाढेल आणि आपल्याला एक स्वच्छ आणि निरोगी वातावरण मिळेल अशा मार्मिक शब्दात प्राचार्य डॉ. संजयकुमार गायकवाड यांनी वृक्षारोपणाचे महत्त्व पटवून दिले व त्यांनी स्वतः वृक्षारोपण केले. महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर वृंदांनी वृक्षारोपणास मोलाचा हातभार लावला आणि फक्त आजच नव्हे तर पुढेही या झाडांची काळजी घेऊ व संगोपन करू असे आवाहन करण्यात आले.

### ARISE २०२४ प्रोजेक्ट अंतर्गत शालेय किट पॅकिंग व डिस्ट्रीब्यूशन चे आयोजन

माहे जून २०२४ मध्ये महाविद्यालय आणि 'अप्रोच हेल्पिंग हँड्स फाउंडेशन' यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १४ व १५ जून २०२४ रोजी 'स्कूल किट पॅकिंग ॲक्टिव्हिटी' चे आयोजन ARISE २०२४ या प्रकल्पांतर्गत आदिवासी विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आले होते. या अभियानामध्ये महाविद्यालया-मधील ३५ विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेतला. हे काम करण्याची संधी दिल्याबद्दल महाविद्यालयाचे आभारही मानले. तसेच दि. २२ जून २०२४ रोजी स्कूल किट वाटपाचे आयोजन अकोले येथे करण्यात आले होते. संगमनेर जिल्ह्यातील अकोले तालुक्यातील ब्राह्मणवाडा, करंडे, बेलापूर, मुक्ताईची वाडी अशा विविध प्राथमिक शाळांना भेट देऊन या स्कूल किटचे वाटप करण्यात आले. सहाय्यक प्राध्यापिका उर्मिला पाटील व सहाय्यक प्राध्यापिका मोहिनी परदेशी या महाविद्यालयाच्या प्रतिनिधी म्हणून अकोले येथे दि. २२ जून २०२४ रोजी उपस्थित होत्या. प्राचार्य डॉ. संजयकुमार गायकवाड व 'अप्रोच हेल्पिंग हँड्स फाउंडेशन'च्या डायरेक्टर पायल मुजुमदार यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम राबविण्यात आला. तसेच अकोले तालुक्यातील विविध शाळांमधील शिक्षकांनीही सहभाग नोंदविला. प्राचार्य डॉ. संजयकुमार गायकवाड यांनी आगामी काळात 'अप्रोच हेल्पिंग हँड्स फाउंडेशन'च्या सहकार्याने मुलांचे समुपदेशन व शिक्षणापासून वंचित राहणाऱ्या गरजू विद्यार्थ्यांसाठी त्यांचे भवितव्य घडविण्यासाठी महाविद्यालय कायम प्रयत्न करेल अशी ग्वाही दिली.

### आंतरराष्ट्रीय योग दिनाचे आयोजन

दि. २१ जून २०२४ रोजी आंतरराष्ट्रीय योग दिनाचे औचित्य साधून ऑनलाइन योगासेशन चे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी श्रीमती सोनाली पाटोळे (योगा ट्रेनर) अतिथी व्याख्यात्या म्हणून लाभल्या. त्यांनी आजच्या धकाधकीच्या जीवनात ध्यानाचे महत्त्व खूप वाढले आहे. चिंता आणि मानसिक तणाव यांचा सामना करण्यासाठी ध्यान हा एक अत्यंत प्रभावी उपाय आहे. ध्यानामुळे मनःशांती मिळते, आत्मविश्वास वाढतो आणि मानसिक स्वास्थ्य टिकून राहते, अशा मार्मिक शब्दात ध्यानाचे आपल्या दैनंदिन जीवनातील महत्त्व पटवून दिले. प्राचार्य डॉ. संजयकुमार गायकवाड यांच्या मते ध्यान ही एक साधी पण प्रभावी पध्दत आहे, जी आपल्या जीवनात शांती आणि समाधान मिळवून देते. या कार्यक्रमात महाविद्यालयाचे शिक्षक व शिक्षकेतर वृंद तसेच विद्यार्थ्यांनी उत्साही सहभाग नोंदविला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन सहाय्यक प्राध्यापिका उर्मिला पाटील यांनी केले.

***

# ❋ कॉलेज ऑफ सायन्स ॲण्ड कॉमर्स, पुणे ९ ❋



दि. ५ जून २०२४ रोजी जागतिक पर्यावरण दिनानिमित्त शिक्षक वृंदाने केलेली वृक्ष लागवड




बेलापूर (ता. अकोले) येथील शाळेतील विद्यार्थ्यांना स्कुल किटचे वाटप करण्यात आले.



ब्राह्मणवाडा येथे विद्यार्थ्यांना स्कुल किटचे वाटप करताना प्राध्यापिका उर्मिला पाटील आदी मान्यवर

## विद्याभवन-नेरुळ, नवी मुंबई शाखा

### विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय

**कुलसचिव : श्री. दिनेश मिसाळ**
**मुख्याध्यापक : श्री. गोरख कदम**

**उच्च माध्यमिक विभाग**

**गुरुवर्य अण्णासाहेब खैर जयंती व प्रवेशोत्सव**

दि. १५ जून २०२४ रोजी शिक्षणमहर्षी कै. डॉ. ग. श्री. तथा अण्णासाहेब खैर जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. शैक्षणिक वर्ष २०२४-२५ ची सुरूवात अण्णांच्या कार्याचा आढावा घेऊन तसेच त्यांच्या सद्विचारांची तसेच सद्गुणांची देवाण-घेवाण करुन झाली. याप्रसंगी कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ, सर्व विभागांचे मुख्याध्यापक श्रीमती श्रीजा नायर, श्री. गोरख कदम, श्रीमती सुवर्णा मिसाळ, श्रीमती मनिषा मुळीक, समन्वयक श्री. पांडुरंग मुळीक, पर्यवेक्षिका श्रीमती अस्मिता सलगर, श्रीमती शोभा लवटे इ. मान्यवर कार्यक्रमास उपस्थित होते. याप्रसंगी श्री. अविनाश कुलकर्णी व श्रीमती कल्पना सोनार यांनी अण्णांच्या आठवणींना उजाळा दिला. कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ यांनी अण्णांच्या जीवनचरित्रावर प्रकाश टाकला. शैक्षणिक वर्षाची सुरूवात विद्यार्थ्यांचे औक्षण करुन पेन्सिल किट देऊन करण्यात आली. यावेळी 'विजय नाहटा फाउंडेशन' व श्री. विजय माने यांच्यातर्फे विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी श्री. विजय नाहटा यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. आई वडिलांचा मान ठेवा, उत्तम नागरिक बना, प्रामाणिकपणे प्रयत्न करा असा सल्ला यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना दिला. शाळेच्या आवारात मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण देखील करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती स्वाती मोटे यांनी केले.

**विद्याभवनचा २३ वा वर्धापन दिन उत्साहात साजरा**

नेरुळ शाखेचा २३ वा वर्धापन दिन दि. १८ जून २०२४ रोजी मोठ्या जल्लोषात साजरा करण्यात आला. याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून अनुसंधान समिती सदस्य प्राचार्य कृ. ना. शिरकांडे, कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे, कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ तसेच निवृत्त मुख्याध्यापक श्री. शिवाजी माळी इ. मान्यवर उपस्थित होते. आसावरी चॅरिटेबल ट्रस्टचे विश्वस्त श्री. किशोर श्रॉफ व श्री. मुकुंद देशमुख हे देखील उपस्थित होते. याप्रसंगी इंग्रजी माध्यमाच्या प्ले ग्रुप वर्गाचे उद्घाटन प्रमुख अतिथी व उपस्थित मान्यवरांच्या शुभहस्ते करण्यात आले. श्रीगणेश पूजन व सरस्वतीपूजन तसेच दादांच्या, अण्णांच्या आणि डॉ. शं. पां. किंजवडेकर यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करुन, दीपप्रज्वलन करुन कार्यक्रमाची सुरुवात झाली. कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ यांनी प्रास्ताविकेतून विद्याभवन नेरुळ शाखेच्या उभारणीपासून आजपर्यंतच्या प्रगतीचा आढावा घेतला. कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे यांनी विद्याभवनच्या प्रगतीचे कौतुक केले व पुढील वर्षी शाखेच्या रौप्य महोत्सवी वर्षाचा शुभारंभ मोठ्या दिमाखात साजरा करण्याचे अधोरेखित केले. सहशिक्षिका श्रीमती नूतन गवांदे यांनी शाळेविषयी सुंदर अशी कविता सादर केली. आसावरी सेठ चॅरिटेबल ट्रस्टतर्फे विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. इ. १०वी व १२ वी मध्ये उज्ज्वल यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी सर्व विभागांचे मुख्याध्यापक श्री. गोरख कदम, श्रीमती श्रीजा नायर, श्रीमती सुवर्णा मिसाळ, श्रीमती मनिषा मुळीक, समन्वयक श्री. पांडुरंग मुळीक, पर्यवेक्षिका श्रीमती शोभा लवटे व श्रीमती अस्मिता सलगर आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सुजय वाबळे यांनी तर, आभार प्रदर्शन प्रा. विद्या झोपे यांनी केले.

## विद्याभवन माध्यमिक इंग्रजी शाळा

**कुलसचिव : श्री. दिनेश मिसाळ**

**प्र. मुख्याध्यापिका : सौ. श्रीजा बा. नायर**

**प्रवेशोत्सव**

दि. १५ जून २०२४ रोजी माध्यमिक इंग्रजी विभागाचा प्रवेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमास कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ, मुख्याध्यापिका श्रीमती श्रीजा नायर, श्री. गोरख कदम, दोन्ही विभागांचा शिक्षकवृंद, विद्यार्थी, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. नवीन शैक्षणिक वर्षाची सुरूवात गणेशपूजन व सरस्वती पूजनाने करण्यात आली. श्रीमती श्रीजा नायर मुख्याध्यापिका, जेष्ठ शिक्षिका श्रीमती राजकुमारी इंदलकर तसेच शिक्षकवृंद या सर्वांनी विद्यार्थ्यांचे औक्षण केले. विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यासाठी रंगीबेरंगी सजावट करण्यात आली होती. सुमधुर स्वागत गीत लावण्यात आले होते. कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ यांनी विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक वर्ष २०२४-२५ साठी शुभेच्छा दिल्या, तसेच विद्यार्थ्यांचे माजी सनदी अधिकारी श्री. विजय नाहटा व श्री. विजय माने यांनी दिलेल्या शालोपयोगी साहित्याचे वाटप करुन स्वागत केले. विद्यार्थ्यांनी शाळेचा पहिला दिवस यावर आपले मनोगत व्यक्त केले. शिक्षकांनीही विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक वर्षासाठी शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षक श्री. जगन्नाथ कोळी यांनी केले.

## विद्याभवन पूर्व प्राथमिक इंग्रजी शाळा

**संचालक : श्री. दिनेश मिसाळ**

**पर्यवेक्षिका : सौ. अस्मिता सलगर**

**प्रवेशोत्सव**

दि. १३ जून २०२४ रोजी पूर्व-प्राथमिक इंग्रजी विभागातर्फे शैक्षणिक वर्ष २०२४-२५ च्या नवीन प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचा प्रवेशोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी शाळा सुशोभित करण्यात आली होती. शिक्षिकांनी पारंपरिक पध्दतीने विद्यार्थ्यांचे औक्षण करुन स्वागत केले. संस्थेचे कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ यांनी विद्यार्थ्यांना भेटवस्तू देऊन नवीन शैक्षणिक वर्षाच्या शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी मुख्याध्यापिका श्रीजा नायर, पर्यवेक्षिका अस्मिता सलगर, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. नवीन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे शाळेत प्रथमच आगमन झाले होते. त्यांना स्मार्ट बोर्डवर चलतचित्रे, गाणी इ. दाखवून मनोरंजन करण्यात आले. त्याचप्रमाणे शाळेने उपलब्ध करुन दिलेल्या सेल्फी पॉईंट वर विद्यार्थ्यांचे फोटो घेण्यात आले.

## विद्याभवन प्राथमिक मराठी शाळा

### नेरूळ शाखा,नवी मुंबई

**कुलसचिव : श्री. दिनेश मिसाळ**

**मुख्याध्यापिका : सौ. सुवर्णा दिनेश मिसाळ**

**प्रवेशोत्सव**

नवा गणवेश, नवे दप्तर, नवीन पाठ्यपुस्तके आणि बालगोपाळांच्या किलबिलाटाने शैक्षणिक वर्ष २०२४-२५ चा शुभारंभ झाला. दि. १५ जून रोजी मोठ्या जल्लोषात व आनंदाने प्रवेशोत्सव साजरा करण्यात आला. शाळेच्या प्रवेशद्वारावर रांगोळी काढण्यात आली. सुविचारांनी सजवलेले स्वागतपर फलक लावण्यात आले. रंगीबेरंगी फुग्यांची सजावट करण्यात आली. सभागृहात सेल्फी पॉईंट उभारला. सुट्टी कालावधीत शाळेची अंतर्गत रंगरंगोटी करण्यात आली. शाळा विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी सज्ज झाली. शाळेच्या प्रवेशद्वाराजवळ सर्व शिक्षकांनी पारंपरिक पद्धतीने विद्यार्थ्यांचे औक्षण करुन, सहर्ष स्वागत केले. माजी सनदी अधिकारी श्री. विजय नाहटा व श्री. विजय माने, जिल्हा प्रमुख श्री. दिलीप घोडेकर व कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ यांच्या शुभहस्ते शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. विद्येच्या मंदिरात बुध्दिची देवता श्री गणेश व सरस्वतीचे पूजन करण्यात आले. उपस्थित मान्यवर मुख्याध्यापक व शिक्षकवृंदाने विद्यार्थ्यांना शुभाशीर्वाद व शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

### आंतरराष्ट्रीय योगदिन

दि. २१ जून २०२४ रोजी आंतरराष्ट्रीय योगदिन शालेय सभागृहात साजरा करण्यात आला. योग विद्या निकेतन, वाशी येथील शिक्षिका श्रीमती प्रियंका कुमकर व श्रीमती मंगला बिसनली या उपस्थित होत्या. संस्थेचे कुलसचिव व योग अभ्यासक श्री. दिनेश मिसाळ, मुख्याध्यापिका श्रीमती सुवर्णा मिसाळ, मनिषा मुळीक या उपस्थित होत्या. कुलसचिव दिनेश मिसाळ यांच्या शुभहस्ते प्रमुख अतिथींचे स्वागत व सत्कार करण्यात आला. श्रीमती प्रियंका व मंगला यांनी विद्यार्थ्यांना विविध योगासनांची प्रात्यक्षिके दाखविली. धनुरासन, चक्रासन, ताडासन, पद्मासन, वज्रासन, शीर्षासन इ. आसने विद्यार्थ्यांनी केली. कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ यांनी विविध आसनांचे प्रात्यक्षिक दाखवून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. बकासन, गंड भेरुंडासन, पद्ममयुरासन, नटराजासन इ. आसने विद्यार्थ्यांनी सादर केली. योगदिनानिमित्त कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ यांनी विद्यार्थ्यांना योग व प्राणायामाचे महत्त्व सांगितले. या वर्षाची योगदिनाची थीम 'योग स्वत:साठी आणि समाजासाठी' ही आहे. प्रत्येकाने थोडातरी वेळ काढून आसने करावीत. सर्वांगीण विकासासाठी शारीरिक, मानसिक विकास झाला पाहिजे. त्यासाठी योग अभ्यास करा. दररोज सराव करा, याने बौद्धिक विकासही साधला जाईल. या योग सरावासाठी विद्याभवनमध्ये संध्याकाळी सहा ते सात या वेळात मोफत योगवर्ग घेतला जातो, त्याचा जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा असे सांगून दहाव्या आंतरराष्ट्रीय योगदिनाच्या सर्वांना शुभेच्छा दिल्या.

## विद्याभवन पूर्व प्राथमिक मराठी शाळा

### नेरूळ शाखा,नवी मुंबई

**कुलसचिव : श्री. दिनेश मिसाळ**

**मुख्याध्यापिका : सौ. सुवर्णा दिनेश मिसाळ**

### प्रवेशोत्सव

गुरुवार दि. १३ जून २०२४ रोजी पूर्व-प्राथमिक विभागाचा प्रवेशोत्सव साजरा करण्यात आला. शाळेत विद्यार्थ्यांचा पहिला दिवस होता. सर्व विद्यार्थ्यांचे औक्षण करुन स्वागत करण्यात आले. कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ, मुख्याध्यापक श्री. गोरख कदम, मुख्याध्यापिका श्रीमती श्रीजा नायर, पर्यवेक्षिका श्रीमती शोभा लवटे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना पट्टी, पेन्सिल, शार्पनर व खोड रबर या वस्तू भेट स्वरुपात देण्यात आल्या. विद्यार्थ्यांना मनोरंजन म्हणून डिजिटल बोर्डवर बडबड गीते व कार्टुन्स् दाखविण्यात आली. विद्यार्थ्यांना गार्डन मध्ये खेळायला नेण्यात आले. मुख्याध्यापिका श्रीमती सुवर्णा मिसाळ यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना स्मायली फेस देण्यात आल्या. शाळेचा पहिला दिवस सर्व विद्यार्थ्यांनी मोठ्या आनंदाने साजरा केला.

## विद्याभवन प्राथमिक इंग्रजी शाळा

### नेरूळ शाखा, नवी मुंबई

**कुलसचिव : श्री. दिनेश मिसाळ**

**प्र. मुख्याध्यापिका : सौ. मनीषा मुळीक**

### प्रवेशोत्सव

दि. १५ जून २०२४ रोजी प्राथमिक इंग्रजी विभागाचा विद्यार्थी प्रवेशोत्सव मोठ्या उत्साहात, संगीतमय वातावरणात शाळेच्या सभागृहामध्ये साजरा करण्यात आला. या विद्यार्थी प्रवेशोत्सवास माजी सनदी अधिकारी श्री. विजय नाहटा, कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ, मुख्याध्यापिका श्रीमती मनिषा मुळीक, शिक्षकवृंद आणि विद्यार्थी उपस्थित होते. शाळेच्या प्रवेशद्वारावर विद्यार्थ्यांचे औक्षण करुन त्यांच्यावर पुष्प-पाकळ्यांची उधळण करत नवोगतांचे स्वागत करण्यात

आले. यानंतर अतिथींनी, कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ व मुख्याध्यापिका यांनी विद्यार्थ्यांना भेटवस्तू देऊन, येणाऱ्या नूतन शैक्षणिक वर्षासाठी शुभेच्छा दिल्या. या दिवशी नवोगतांच्या चेहऱ्यावर उत्साह ओसंडून वाहत होता.

### आंतरराष्ट्रीय योग दिवस

दि. २१ जून २०२४ रोजी प्राथमिक इंग्रजी विभागाने दहावा आंतरराष्ट्रीय योग दिवस मोठ्या उत्साहात साजरा केला. यावेळी योग विद्या निकेतनच्या शिक्षिका श्रीमती प्रियंका कुमकर व श्रीमती मंगला बिसनली हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ, मुख्याध्यापिका श्रीमती सुवर्णा मिसाळ, मुख्याध्यापिका श्रीमती मनिषा मुळीक हेही उपस्थित होते. प्रमुख पाहुण्या श्रीमती प्रियंका व मंगल यांनी विद्यार्थ्यांना योगाबद्दल मार्गदर्शन करुन योगाचे डेमॉन्स्ट्रेशन (प्रात्यक्षिक) करत विद्यार्थ्यांकडून विविध योगासने करुन घेतली. कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ यांनी योगाचे महत्त्व सांगून या वर्षाच्या योग दिनाची थीम 'योग स्वत:साठी आणि समाजासाठी' आहे असे सांगून विद्यार्थ्यांना सूर्यनमस्कार, कुक्कुटासन, मत्स्यासन, शीर्षासन, धनुरासन अशी विविध आसनांची प्रात्यक्षिके करुन दाखवली. सर्व विद्यार्थ्यांनी योगासनांचे महत्त्व समजून घेत योगासनांचा आनंद घेतला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन श्रीमती प्रतिभा कुमकर यांनी केले.

***

## ✻ विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, नेरुळ शाखा, नवी मुंबई ✻



शाळा प्रवोशोत्सव दिनी विद्यार्थिनींचे औक्षण करुन स्वागत करताना ज्येष्ठ शिक्षिका श्रीमती राजकुमारी इंदलकर व श्रीमती जयश्री तिपायले



**विद्यार्थ्यांना भेटवस्तू देऊन त्यांचे स्वागत करताना कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ**

## ✻ विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, नेरुळ शाखा, नवी मुंबई ✻



प्रवेशोत्सवानिमित्त विद्यार्थ्यांचे स्वागत करताना श्री. विजय नाहटा, श्री. विजय माने, कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ, मुख्याध्यापिका श्रीमती सुवर्णा मिसाळ व आदी मान्यवर



दि. २१ जून २०२४ आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त विद्यार्थ्यांसमवेत योग प्रात्यक्षिके करताना कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ

दि. १५ जून २०२४ रोजी शिक्षणमहर्षी कै. डॉ. अण्णासाहेब खैर यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेचे पूजन करताना घाटकोपर शाखेचे माजी विद्यार्थी व **VB** ॲपचे निर्माते श्री. संकेत वैद्य आणि कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ



# कॉलेज ऑफ इंजिनिअरींग व टेक्नॉलॉजी आणि जी.के.पाटे (वाणी) व्यवस्थापन महाविद्यालय, पुणे

**संचालक : श्री. सुनील रेडेकर**

**संचालक : प्रा. राजेंद्र गो. कडुसकर**

### ई अॅण्ड टीसी विभाग

ई अँड टीसी विभागाच्या विभागप्रमुख प्रा. डॉ. सौ. कल्याणी कुलकर्णी यांनी आयआयटी, कानपूर या प्रौद्योगिकी संस्थेने आयोजित केलेल्या 'नर्चरिंग फ्यूचर लीडरशिप प्रोग्रॅम' या पाच दिवसीय वर्कशॉप मध्ये भाग घेतला. या वर्कशॉप दरम्यान प्रा. सौ. कल्याणी कुलकर्णी यांनी फ्लेक्सिबल इलेक्ट्रॉनिक्स सेंटर या उपक्रमाला भेट देऊन कॉलेजसाठी प्रकल्प सहयोगाच्या दृष्टीने डॉ. देवेंद्रकुमार मौर्य व डॉ. सिध्दार्थ पांडा यांच्याशी विचारविनिमय केला. तसेच डिझाईन थिंकिंग या विषयासंदर्भात प्रा. जे. रामकुमार यांच्याशीही संवाद साधला आणि महाविद्यालयाच्या संशोधन आणि विकासाच्या संदर्भात प्रा. तरुण गुप्ता (डीन-संशोधन आणि विकास) यांच्याशी संवाद साधला.

अणू विद्युत् आणि दूरसंचार विभाग व मुद्रण अभियांत्रिकी विभाग यांच्यातर्फे इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअर्स, पुणे लोकल सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने १० जून ते १४ जून २०२४ या कालावधीमध्ये ''डिझाईन थिंकिंग अँड आयडिया लॅब'' या विषयावर फॅकल्टी डेव्हलपमेंट वर्कशॉप आयोजित करण्यात आले. या कार्यक्रमाचे उद्घाटन प्रमुख पाहुणे व प्रवक्ते डॉ. प्रशांत पानसरे, फाउंडर अँड सीईओ, रुबिस्केप, इंडिया यांच्या हस्ते झाले. महाविद्यालयाचे संचालक श्री. सुनिल रेडेकर व प्रा. राजेंद्र कडुसकर यांनी याप्रसंगी उपस्थितांना मार्गदर्शन केले. प्र. प्राचार्य डॉ. मनोज तारांबळे यांनी याप्रसंगी त्यांचे मनोगत व्यक्त केले. डॉ. कल्याणी कुलकर्णी यांनी वर्कशॉप बद्दल उपस्थितांना माहिती दिली. तज्ज्ञ प्रवक्त्यांमध्ये डॉ. क्षिप्रा मोघे, सीओईपी टेक्नॉलॉजिकल युनिव्हर्सिटी, डॉ. प्रशांत पानसरे, रूबिस्केप इंडिया, डॉ. संदीप वानखडे, ट्रेनर, ट्रीझ एशिया, श्री. ओंकार पाटील, वायनम ऑटोमेशन, श्री. प्रथमेश गोसावी, द सिव्हिलायझेशन प्रोजेक्ट, कु. साजिरी लामरूद, टीसीएस, श्री. किरण सबनीस, गुरुमंत्र अकॅडेमिक्स प्रायव्हेट लिमिटेड, डॉ. देवेंद्र मौर्य, नॅशनल सेंटर फॉर फ्लेक्झिबल इलेक्ट्रॉनिक्स, आयआयटी, कानपुर या मान्यवरांचा समावेश होता.

प्रा. वैदेही विवेक सोवनी यांनी दि. ११ जून - १४ जून २०२४ ''टीचर ट्रेनिंग कार्यशाळा अर्थशास्त्र आणि नीतीशास्त्र'' IIT - इंदोर, मध्य प्रदेश येथे पूर्ण केला. ही कार्यशाळा IKS-MoE, भारत सरकार आणि UGC, चाणक्य विद्यापीठ, बेंगलोर आणि श्री श्री विद्यापीठ, कटक यांनी आयोजित केली होती.

महाविद्यालय व अंबिका महाविद्यालय तसेच जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, टाहाकारी तालुका अकोले जिल्हा अहमदनगर-४२२६०१ यांच्या सयुंक्त विद्यमाने योगासने - प्राणायाम आणि जीवनशैली बाबत, दि. १८ व १९ जून २०२४ रोजी कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेला अध्यक्ष पद्मश्री सन्मानित बीजमाता राहीबाई सोमा पोपरे, पोपेरवाडी, कोंभाळणे यांची उपस्थिती लाभली. कार्यशाळेमध्ये प्राध्यापक रविंद्र पाटील यांनी योगासने आणि प्राणायाम यांचे महत्त्व सांगून काही प्रात्यक्षिके करून घेतली. त्यांच्या समवेत अर्चना पाटील यांनी दैनंदिन जीवनात शारीरिक स्वास्थ कसे सांभाळावे, तसेच उत्कृष्ट दिनचर्या कशी असावी याबाबत मार्गदर्शन केले. या कार्यशाळेचे आयोजन शाळेतील माजी विद्यार्थिनी कुमारी स्वाती एखंडे आणि कुमार वैभव काळे यांनी केले होते.

अंबिका महाविद्यालय, टाहाकारी येथे माजी विद्यार्थिनी कु. स्वाती एखंडे यांचा पद्मश्री बीजमाता - राहीबाई सोमा पोपरे, भारतीय शेतकरी आणि संरक्षक यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

## मेकॅनिकल अभियांत्रिकी विभाग

यांत्रिकी विभागात ए एस एम इंटरनॅशनल पुणे, चॅप्टर तर्फे एका सप्ताहाचे Hands on training on IPR (Patent, copyright & trademark) या विषयावर फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम आयोजित करण्यात आला. यामध्ये प्रोफेसर कुमार राजु, डॉ. दीप्ती पाटील, डॉक्टर तपोव्रता डे, प्रोफेसर ऋषिकेश टिके, ॲडव्होकेट क्षितिजा कुलकर्णी, ॲडव्होकेट लुनालीसा पी. या विविध क्षेत्रातील तज्ज्ञांनी पेटंट, कॉपीराइट आणि ट्रेडमार्क यावर माहिती दिली. या कार्यक्रमासाठी विभागप्रुख डॉ. एम. एम. भूमकर यांनी संयोजन केले, आणि प्रोफेसर ऋषिकेश टिके व संकेत चीक्षे यांनी समन्वयकांची भूमिका बजावली.

## इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग विभाग

दि. १० ते १४ जून २०२४ मध्ये ''इमर्जिंग ट्रेंड्स इन एनर्जी सिस्टिम्स'' या विषयावर फॅकल्टी डेव्हलपमेंट कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. ही कार्यशाळा आय एस टी ई द्वारे अनुमत आणि आय ई ई ई, पुणे सेक्शनच्या पी ई एस आय ए एस चॅप्टर द्वारा प्रायोजित केली होती. एकूण २६ शिक्षकांनी या कार्यशाळेमध्ये सहभाग घेतला. दि. १० जून रोजी, कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी संचालक श्री. सुनिल रेडेकर, व प्रा. राजेंद्र कडुसकर, आय एस टी ई तर्फे डॉ. यशवंत कोळेकर, आय ई ई ई तर्फे डॉ. सुरेखा देशमुख आणि प्र. प्राचार्य डॉ. मनोज तारांबळे उपस्थित होते. सदर कार्यशाळेचा समारोप समारंभ दि. १४ जून २०२४ रोजी डॉ. संतोष पटनी, डेप्युटी एक्झिक्युटिव्ह इंजिनिअर, महावितरण, पुणे यांच्या उपस्थितीत पार पडला. त्यावेळी सहभागी यशस्वी प्राध्यापकांना प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली. कार्यशाळेचे आयोजन डॉ. मंदार भवाळकर, प्रा. उदय सरोदे आणि प्रा. राधा रांजेकर यांनी विभाग प्रमुख डॉ. मंगेश ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली केले होते.

## इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी विभाग

❊ माहिती तंत्रज्ञान विभागाने दि. २७ एप्रिल २०२४ रोजी Full Stack Web Development Hackathon स्पर्धा आयोजित केली होती.

❊ माहिती तंत्रज्ञान विभागाने अंतिम वर्ष अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांचे प्रकल्प प्रदर्शन १२ एप्रिल २०२४ रोजी आयोजित केले होते.

❊ पीबीएल प्रकल्पासाठी द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांची पोस्टर स्पर्धा १६ एप्रिल २०२४ रोजी आयोजित करण्यात आली होती.

## एआयडीएस विभाग

नवीन शैक्षणिक वर्षात, २०२४-२५, आर्टिफिशियल इंटेलिजन्स आणि डेटा सायन्स या विभागाने कॉम्प्युटर व आय टी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने ''रिसर्च मेथोडोलॉजी: टूल्स अँड टेक्निक्स'' ही पाच दिवसांची राष्ट्रीय पातळीवरची कार्यशाळा १० जून ते १४ जून या कालावधीत आयोजित केली होती. या कार्यशाळेत ८ विविध संस्थांमधून सुमारे ४३ शिक्षक आणि विद्यार्थी यांनी सक्रिय सहभाग घेतला. या कार्यशाळेत एसएसबीएम या स्वित्झर्लंड मधील प्रख्यात मॅनेजमेंट इन्स्टिट्यूट मधून आशिष लेवळकर या रिसर्च स्कॉलरने देखील सहभाग घेतला होता. कार्यशाळेत रिसर्च पेपर ड्राफ्ट करून त्याची स्पर्धा घेण्यात आली. त्यामध्ये AI and DS च्या कबीर मर्चंट याचा पहिला नंबर आला. डॉ. अनुजा शुक्ला, डॉ. दीप्ती पाटील, डॉ. परीक्षित महल्ले, डॉ. मीनाक्षी अत्रे, डॉ. अर्चना ठोसर आणि प्रथमेश गोसावी या प्रख्यात वक्त्यांनी कार्यशाळा यशस्वी होण्यासाठी मोलाची भूमिका बजावली. या कार्यशाळेत पुढील उद्दिष्टांवर लक्ष केंद्रित करण्यात आलेः

१. विविध संशोधन साधने शिकण्यासाठी आणि निवडलेल्या क्षेत्रात संशोधन पत्राचा मसुदा तयार करणे.

२. संशोधनाच्या स्वरूपावर आधारित गृहीतक तयार करण्याची आणि त्याची चाचणी करण्याची क्षमता प्रदान करणे, संशोधन प्रस्ताव लेखन शिकणे.

३. निधी पुरवणाऱ्या संस्था आणि त्यांची निधी यंत्रणा शोधणे.

४. नैतिक संशोधनाबद्दल जागरूकता निर्माण करणे- साहित्यचोरी रोखणे

या कार्यशाळेची जबाबदारी डॉ मीनाक्षी अत्रे, प्रा.उर्मिला कलशेट्टी व डॉ. सुरेंद्र महाजन या विभाग प्रमुखांनी, प्रा. विजया कानडे, प्रा. आदित्य डोंगरे व प्रा. मृदुल फडके यांनी यशस्वीपणे पार पाडली.

**प्रथम वर्ष अभियांत्रिकी विभाग**

SSPU, NEP च्या अभ्यासक्रमानुसार आणि 'नॅक' च्या आवश्यकतेनुसार प्रथम वर्ष विभागाच्या सर्व प्राध्यापकांनी त्यांच्या विषयानुसार विविध विभागांनी आयोजित केलेल्या फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रामच्या (FDP-२०२४-२५) संधींचा लाभ घेतला.

**जागतिक योग दिवस**

महाविद्यालयातील क्रीडा आणि एन.एस.एस. विभागाने संयुक्तपणे १० वा आंतरराष्ट्रीय योग दिन (IDY) साजरा केला. योग तज्ज्ञ श्रीमती राधा शर्मा यांनी योगाद्वारे लाभणाऱ्या शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक आरोग्याविषयी मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रमाचे आयोजन संचालक श्री. सुनिल रेडेकर आणि प्रा. राजेंद्र कडुसकर आणि प्र. प्राचार्य डॉ. मनोज तारांबळे यांच्या मार्गदर्शनातून प्रा. उदय बी. सरोदे, एन.एस.एस. कार्यक्रम अधिकारी आणि प्रा. नामदेव आर. बन्ने, क्रीडा आणि शारिरीक शिक्षण प्रमुख यांनी केले.

***

# अभियांत्रिकी व धामणकर व्यवस्थापन महाविद्यालय, म्हसरूळ, नाशिक

**संचालक : संजय नि. गुंजाळ**

**प्राचार्य : डॉ. एम. व्ही. भालेराव**

**छत्रपती शाहु महाराज यांची जयंती साजरी**

महाराष्ट्रातील थोर लोकनेते छत्रपती शाहु महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या प्रारंभी प्राचार्य डॉ. एम. व्ही. भालेराव यांच्या हस्ते छत्रपती शाहु महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या प्रसंगी सर्व विभाग प्रमुख प्राध्यापक वृंद आणि विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक ग्रंथपाल श्री. संदीप दराडे यांनी केले. त्यांनी आपल्या भाषणात बोलताना छत्रपती राजर्षी शाहू महाराज हे बहुजन समाजाचा महानायक, शेतकऱ्यांचा उध्दारकर्ता, दूरदृष्टीचा, विशाल मनाचा राजा व एक लोकनेता होता. त्यांनी समाजातील बहुजन, - मागासलेल्या तळागाळातील वर्गाला समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याकरिता अनेक कार्ये केली. उदा. मुलांच्या सक्तीच्या शिक्षणासाठी पालकांना दंड, सहकारत्वाची भावना वाढविणे, जनहितार्थ कायद्याची मांडणी करणे, आंतरजातीय विवाहाला प्रोत्साहन देणे, विधवा पुर्नविवाह कायदा आणणे, मूलगामी सुधारणा करणे, शेतीसाठीची पाणीव्यवस्था पाटबंधारे, कोल्हापुरी बंधारे आणि मालासाठी बाजारपेठा व कारखाने यांची उभारणी आदी उपक्रम राबविले. शाहु महाराजांनी 'नव्या सामजिक क्रांतीचा' पुरस्कार केला, शिक्षणाची संकल्पना, जातवार नेतृत्व, स्वाबलंबन, शिस्त, सहकार्य, नियमितता, सहिष्णुता, देशप्रेम इत्यादी गुण समाजात रुजविण्याचा प्रयत्न केला. लोकशाही, नवनिर्मितीक्षम आणि सामाजिक सुधारणेचा पाया रचणारे राजर्षी शाहु महाराजांचे शिक्षणविषयक धोरण आजही देशाला प्रेरणादायी ठरत आहे. कार्यक्रमाच्या शेवटी कु. प्राजक्ता देवरे यांनी सर्वांचे आभार मानले.

***

**आपला पत्ता बदललेला आहे का?**

**समाचार संदर्भातील आपला बदललेला पत्ता त्वरीत कळवावा ही विनंती.**

**पत्ता कळविताना जुना व नवा दोन्ही पिन कोड तसेच आपला ईमेल आयडी सुध्दा कळवावा म्हणजे आपणास ई-समाचार पाठविणे सोईचे होईल.**

pvgsamachar@gmail.com

**या ईमेल आयडी वर कळवावे.**

**संपादक**

# हितचिंतक व आश्रयदाते यांच्या मदतीचे वृत्त, पुणे विभाग

**कोषाध्यक्ष – श्री. कृष्णाजी कुलकर्णी**

**दि. १.५.२०२४ ते ३१.५.२०२४**

**पुढील देणगीदारांनी संस्थेला देणगी देऊन सक्रिय सहाय्य केलेले आहे.**
**संस्थेविषयी दर्शवित असलेल्या आत्मीयतेबद्दल आम्ही सर्वांचे आभारी आहोत.**
**(देणगी व्याजाचा विनियोग देणगी प्राप्त झाल्यानंतर पुढील वर्षापासून १५ वर्षांपर्यंत केला जातो.)**

देणगी रु. १०,००१/- वरील सर्व

●**नाव** - **श्री. अनिरुध्द माधव कुमठेकर**
**श्री. अवधूत माधव कुमठेकर, पुणे**



मालतीबाई सरपोतदार



पुरुषोत्तम सरपोतदार

**देणगी** - रु. १,००,०००/-
**दिनांक** - २.५.२०२४
**निमित्त** - कै. मालतीबाई पुरुषोत्तम सरपोतदार (२ मे ) आणि कै. पुरुषोत्तम गजानन सरपोतदार (२७ ऑक्टोबर ) यांचे स्मृतिदिनानिमित्त
**विनियोग** - देणगी व्याज विनियोग मिष्टान्न भोजन

●**नाव** - **सौ. दिपाली केदार बोरगावकर, पुणे**
**देणगी** - रु. २५,०००/-
**दिनांक** - २९.५.२०२४
**निमित्त** - कै. गजानन शंकर बोरगावकर यांचे स्मृतिदिनानिमित्त
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग शैक्षणिक मदतीसाठी

●**नाव** - **श्री. विनायक मुरलीधर एडगांवकर, नाशिक**
**देणगी** - रु. २१,०००/-
**दिनांक** - ३१.५.२०२४
**निमित्त** - कै. गोपाळ महादेव एडगांवकर यांचे स्मृतिदिनानिमित्त
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग संस्थावाढीसाठी

●**नाव** - **श्री. रमेश भास्कर ढमढेरे, पुणे**
**देणगी** - रु. २०,०००/-
**दिनांक** - २४.५.२०२४
**निमित्त** - कै. रविंद्र भास्कर ढमढेरे व आई कै. श्रीमती इंदिरा भास्कर ढमढेरे यांचे स्मृतिदिनानिमित्त (१७ जून)
**विनियोग** - संपूर्ण देणगी रक्कम मिष्टान्नासह संपूर्ण भोजन



माणिकबाई नाईक

●**नाव** - **श्री. धैर्यशील कृष्णराव नाईक, पुणे**
**देणगी** - रु. १५,०००/-
**दिनांक** - ३.५.२०२४
**निमित्त** - कै. श्रीमती माणिकबाई कृष्णराव नाईक (फाल्गुन वद्य ९) यांचे स्मृतिदिनानिमित्त
**विनियोग** - देणगी व्याजविनियोग अन्नदान

●**नाव** - **श्री. हर्षल प्रभाकर वेळापुरे, पुणे**
**देणगी** - रु. १३,०००/-
**दिनांक** - ३०.५.२०२४
**निमित्त** - कै. कुसुम प्रभाकर वेळापुरे यांचे स्मृतिदिनानिमित्त (२७ जून)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग मिष्टान्नासह संपूर्ण भोजन

●**नाव** - **श्री. ज्ञानदेव धुळा लवटे, (मा. वि.) सोलापूर**
**देणगी** - रु. ११,५००/-
**दिनांक** - १५.५.२०२४
**निमित्त** - संस्थेच्या ११५ व्या वर्धापनदिनानिमित्त माजी विद्यार्थी ऋणविमोचनार्थ
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग संस्थावाढीसाठी

देणगी रु. ५,००१/- ते रु. १०,०००/-

●**नाव** - **श्री. मनीष शर्मा, मुंबई**
**देणगी** - रु. ६,०००/-
**दिनांक** - ६.५.२०२४
**निमित्त** - कै. रामचंद्र गिरीधारीलाल शर्मा यांचे स्मृतिदिनानिमित्त (७ मे)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

●**नाव** - **श्री. मोहन धुंडीराज घारपुरे, पुणे**
**देणगी** - रु. ७,५००/-
**दिनांक** - ६.५.२०२४
**निमित्त** - कै. धुंडीराज महादेव घारपुरे (रु. ५,०००/-)
कै. सौ. माधवी मोहन घारपुरे (रु. २,५००/-) यांचे स्मृतिदिनानिमित्त
**विनियोग** - देणगी रु. ५,०००/- विनियोग शैक्षणिक मदतीसाठी उर्वरित देणगी रु. २,५००/- व्याजविनियोग अन्नदान

●**नाव** - **श्री. विश्वास प्रभाकर आंबर्डेकर, पुणे**
**देणगी** - रु. १०,०००/-
**दिनांक** - ८.५.२०२४
**निमित्त** - कै. प्रभाकर कृष्णराव आंबर्डेकर यांचे पुण्यस्मरणार्थ (चैत्र वद्य ३०)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग शैक्षणिक मदतीसाठी

●**नाव** - **श्री. रविंद्र लक्ष्मण लोणकर, (मा. वि.), पुणे**
**देणगी** - रु. ५,००१/-
**दिनांक** - १०.५.२०२४
**निमित्त** - कै. आशा रविंद्र लोणकर यांचे स्मृतिदिनानिमित्त
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

●**नाव** - **श्रीमती मीना किशोर अंतुरकर, पुणे**


किशोर अंतुरकर


वसंत गुप्ते



विमल गुप्ते

**देणगी** - रु. १०,०००/-
**दिनांक** - ११.५.२०२४
**निमित्त** - कै. किशोर श्रीपाद अंतुरकर (रु.५,०००)
कै. वसंत प्रभाकर गुप्ते (रु. २,५००)
कै. विमल वसंत गुप्ते (रु. २,५००) यांचे स्मृतिदिनानिमित्त
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग शैक्षणिक मदतीसाठी



श्री. अशोक कस्तुरे

**●नाव - श्री. अशोक रामचंद्र कस्तुरे, (मा. वि.), पुणे**
**देणगी** - रु. ५,००१/-
**दिनांक** - १२.५.२०२४
**निमित्त** - कै. कमल गोपाळ बोराटे यांचे स्मृतिदिनानिमित्त (चैत्र शुध्द ९)
**विनियोग** - देणगी व्याज विनियोग अन्नदान



खंडेराव क्षीरसागर

**●नाव - श्री. ललितकुमार खंडेराव क्षीरसागर, पुणे**
**देणगी** - रु. १०,०००/-
**दिनांक** - १५.५.२०२४
**निमित्त** - कै. खंडेराव प्रल्हाद क्षीरसागर यांचे स्मृतिदिनानिमित्त
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान



मनोरमा खोडे

**●नाव - श्री. प्रकाश दिगंबर खोडे, पुणे**
**देणगी** - रु. १०,०००/-
**दिनांक** - २१.५.२०२४
**निमित्त** - कै.मनोरमा दिगंबर खोडे यांचे स्मृतिदिनानिमित्त (२३ मे)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग मिष्टान्न

**●नाव - डॉ. नंदकुमार भालचंद्र देशपांडे, पुणे**
**देणगी** - रु. १०,०००/-
**दिनांक** - ९.५.२०२४ व २४.५.२०२४
**निमित्त** - कै. सुधा भालचंद्र देशपांडे
कै. भालचंद्र खंडेराव देशपांडे
यांचे स्मृतिदिनानिमित्त (२३ जुलै)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान



गिरीश पालकर


**●नाव - सौ. विद्या रविकिरण तिखे, पुणे**
**देणगी** - रु. ७,१५०/-
**दिनांक** - २५.५.२०२४
**निमित्त** - कै. गिरीश लक्ष्मण पालकर यांचे स्मृतिदिनानिमित्त (२४ जून)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग
रु. २,५००/- अल्पोपहार - पोहे
रु. ४,६५०/- अल्पोपहार - साबुदाणा खिचडी

**देणगी रु. ४,००१/- ते रु. ५,०००/-**



विनायक भट

**●नाव - श्री. विद्याधर विनायक भट, पुणे**
**देणगी** - रु. ५,०००/-
**दिनांक** - ४.५.२०२४
**निमित्त** - कै. विनायक कृष्णाजी भट यांचे स्मृतिदिनानिमित्त (२४ एप्रिल)
**विनियोग** - देणगी व्याज विनियोग अन्नदान



चाळू पाटील

**●नाव - श्री. मोहन चाळू पाटील, (मा. वि.) पुणे**
**देणगी** - रु. ५,०००/-
**दिनांक** - २७.५.२०२४
**निमित्त** - कै.चाळू कृष्णा पाटील यांचे स्मृतिदिनानिमित्त (२ मार्च)
**विनियोग** - देणगी व्याज विनियोग अन्नदान

●**नाव** - **श्री. किरण रामेश्वर बैरागी, (मा. वि.) नाशिक**
**देणगी** - रु. ५,०००/-
**दिनांक** - २८.५.२०२४
**निमित्त** - कै. रामेश्वर बाबुराव बैरागी यांचे स्मृतिदिनानिमित्त (१५ जुलै)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग मिष्टान्नासह संपूर्ण भोजन

**देणगी रु. ३,००१/- ते रु. ४,०००/-**

●**नाव** - **सौ. स्वप्ना दीपक सरदेसाई, पुणे**
**देणगी** - रु. ३,५००/-
**दिनांक** - ६.५.२०२४
**निमित्त** - कै. पद्माकर रामकृष्ण सहस्त्रभोजनी यांचे स्मृतिदिनानिमित्त (१५ जून)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

●**नाव** - **कु. ऐश्वर्या आमोद साने चि. इशांत आमोद साने, पुणे**
**देणगी** - रु. ४,०००/-
**दिनांक** - २८.५.२०२४
**निमित्त** - आजोबा कै. भालचंद्र माधव केळकर (२९ मे) आजी कै. उषा अरविंद साने (२८ मे) यांचे स्मृतिदिनानिमित्त
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

**देणगी रु. १,००१/- ते रु. २,०००/-**

●**नाव** - **श्री. चंद्रकांत हरी पळसुले, नाशिक**
**देणगी** - रु. १,५०१/-
**दिनांक** - ७.५.२०२४
**निमित्त** - कै. हरी गोपाळ पळसुले (९ मे)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

●**नाव** - **श्री. रविंद्र रघुनाथ देव, पुणे**
**देणगी** - रु. १,००१/-
**दिनांक** - ९.५.२०२४
**निमित्त** - कै. रघुनाथ गणेश देव यांचे स्मृतिदिनानिमित्त (२७ एप्रिल)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

●**नाव** - **सिध्दी संजय क्षीरसागर, पुणे**
**देणगी** - रु. २,०००/-
**दिनांक** - १०.५.२०२४
**निमित्त** - अक्षयतृतीयानिमित्त (१० मे)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

●**नाव** - **श्री. कमलाकर अनंत जाईल, पुणे**
**देणगी** - रु. २,०००/-
**दिनांक** - २१.५.२०२४
**निमित्त** - कै. अजित कमलाकर जाईल यांचे स्मृतिदिनानिमित्त (वैशाख शुध्द १३)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

●**नाव** - **श्री. सुधीर रामकृष्ण पळसुले, पुणे**
**देणगी** - रु. १,५०१/-
**दिनांक** - २१.५.२०२४
**निमित्त** - कै. रामकृष्ण दत्तात्रय पळसुले यांचे स्मृतिदिनानिमित्त (२ जून)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग मिष्टान्न


मीना परांजपे

●**नाव** - **श्री. प्रदीप दिनकर परांजपे, पुणे**
**देणगी** - रु. १,००१/-
**दिनांक** - २८.५.२०२४
**निमित्त** - कै. मीना दिनकर परांजपे (२८ मे) यांचे स्मृतिदिनानिमित्त
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

●**नाव** - **श्री. अमेय अरुण खिस्ती, पुणे**
**देणगी** - रु. २,०००/-
**दिनांक** - २८.५.२०२४
**निमित्त** - कै. निखिल व कै. अरुण खिस्ती यांचे स्मृतिदिनानिमित्त (२८ मे)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

●**नाव** - **श्री. श्रीकांत व चिंतामण वासुदेव देशपांडे, पुणे**
**देणगी** - रु. १,००१/-
**दिनांक** - २८.५.२०२४
**निमित्त** - कै. पुष्पलता वासुदेव देशपांडे यांचे स्मृतिदिनानिमित्त (२७ मे)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

## देणगी रु. ५०१/- ते रु. १,०००/-

●**नाव** - **श्रीमती संजीवनी सुहास घारपुरे, पुणे**
**देणगी** - रु. १,०००/-
**दिनांक** - ७.५.२०२४
**निमित्त** - कै. सुहास लक्ष्मण घारपुरे व कै. पुष्पा रघुनाथ करंदीकर यांचे स्मृतिदिनानिमित्त (७ मे)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

●**नाव** - **सौ. फाल्गुनी अमरेंद्र देवधर, पुणे**
**देणगी** - रु. १,०००/-
**दिनांक** - ९.५.२०२४
**निमित्त** - कै. भास्कर रानडे यांचे स्मृतिदिनानिमित्त
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

●**नाव** - **श्री. अमित प्रकाश हराळ, पुणे**
**देणगी** - रु. ५०१/-
**दिनांक** - १०.५.२०२४
**निमित्त** - कै. शरद मारुती हराळ यांचे स्मृतिदिनानिमित्त (१० मे)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

●**नाव** - **सौ. शुभांगी कुलकर्णी, पुणे**
**देणगी** - रु. १,०००/-
**दिनांक** - २४.५.२०२४
**निमित्त** - कै. एकनाथ नामदेव देशपांडे यांचे स्मृतिदिनानिमित्त (२१ मे)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग शैक्षणिक मदतीसाठी

●**नाव** - **श्री. श्रीकांत दामोदर शिखरे, पुणे**
**देणगी** - रु. ५०१/-
**दिनांक** - २५.५.२०२४
**निमित्त** - कै. सुरेश विनायक सप्तर्षी यांचे स्मृतिदिनानिमित्त (९ जून)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

**नाव** - **श्रीमती कुंदा कान्हेरे, पुणे**
**देणगी** - रु. ५०१/-
**दिनांक** - २८.५.२०२४
**निमित्त** - कै. दत्तात्रय कान्हेरे यांचे स्मृतिदिनानिमित्त (२८ मे)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

●**नाव** - **श्री. रविंद्र सुरेश सप्तर्षी, पुणे**
**देणगी** - रु. १,००१/-
**दिनांक** - २८.५.२०२४
**निमित्त** - कै. सुरेश विनायगक सप्तर्षी यांचे स्मृतिदिनानिमित्त
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

**देणगी रु. ५००/- खालील सर्व**

**●नाव - श्रीमती रेखा ठकार, पुणे**
**देणगी** - रु. १०१/-
**दिनांक** - ६.५.२०२४
**निमित्त** - कै. श्रीमती नीला विश्वनाथ ठकार यांचे स्मृतिदिनानिमित्त (७ जून)
**विनियोग** - देणगी रकमेचा विनियोग अन्नदान

**●नाव - श्री. डी. एम. पळणीटकर, पुणे**
**देणगी** - रु. ५००/-
**दिनांक** - १०.५.२०२४
**निमित्त** - प्रतिमहाप्रमाणे
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

**●नाव - मा. ट्रस्टी एच. आर. नगरकर एस. व्ही. निधी, पुणे**
**देणगी** - रु. ५००/-
**दिनांक** - १८.५.२०२४
**निमित्त** - कै. एच. आर. नगरकर यांचे स्मृतिदिनानिमित्त
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग शैक्षणिक मदतीसाठी

**●नाव - श्री. राहुल रत्नाकर पुंडे, पुणे**
**देणगी** - रु. ५००/-
**दिनांक** - २२.५.२०२४
**निमित्त** - कै. सचिन रत्नाकर पुंडे यांचे स्मृतिदिनानिमित्त (२७ जून)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

**वस्तुरूप देणगी अंदाजे मूल्य रु.**

१) **सौ. विजया प्रभाकर कुलकर्णी, पुणे**
पणतू चि. अद्विक विनयकुमार याचे वाढदिवसानिमित्त
श्रीराम लक्ष्मणास ड्रेस रु. १,०००/- व
श्रीरामलक्ष्मणास कंठा रु. ४,४२५/-

२) **श्री. रिवेश वदे, पुणे**
महायोग परिवर्तनाचा पसायदान वैज्ञानिक व्यवहारिक व प्रभावी साधनासहित पुस्तक ३ प्रती, रु. ७५०/-

३) **सौ. फाल्गुनी अमरेंद्र देवधर, पुणे**
कै. उषा सुहास आपटे यांचे पुण्यस्मरणार्थ पारले २४ लहान पुडे, चॉकलेट, माहिमचा हलवा, रु. ७००/-

४) **श्री. परेश तुकाराम पांचाळ, पुणे**
कै. तुकाराम राजाराम पांचाळ यांचे पुण्यस्मरणार्थ, हरबरा डाळ अर्धा कि., तूप १ कि., रु. २५१/-

५) **श्रीमती स्वाती कर्वे, पुणे**
सौ. अश्विनी काशीकर यांचे वाढदिवसानिमित्त
पुस्तक-ओमान मस्कत १ प्रत रु. १६०/-

**वाढदिवसानिमित्त व विवाह वाढदिवसानिमित्त देण्यात आलेल्या देणग्या**

**●नाव - श्री. प्रभाकर केशव कुलकर्णी, पुणे**
**देणगी** - रु. ६६,०००/-
**दिनांक** - १२.५.२०२४
**निमित्त** - ६६ व्या विवाह वाढदिवसानिमित्त (११ मे)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग संस्थावाढीसाठी

**नाव - श्री. देवेंद्र दामोदर पांडे, पुणे**
**देणगी** - रु. १०,०००/-
**दिनांक** - ११.५.२०२४
**निमित्त** - विवाह वाढदिवसानिमित्त
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

**नाव** - **श्री. बाळकृष्ण लक्ष्मणराव पटवर्धन, मुंबई**
**देणगी** - रु. ५,६०१/-
**दिनांक** - १५.५.२०२४
**निमित्त** - ५६ व्या विवाह वाढदिवसानिमित्त (१५ मे)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

**नाव** - **श्रीमती श्रीजा बाबुराव नायर, नवी मुंबई**
**देणगी** - रु. १,५००/-
**दिनांक** - ३०.५.२०२४
**निमित्त** - चि. प्रणव नायर याचे वाढदिवसानिमित्त
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

**नाव** - **श्री. सदानंद नारायण साळुंके, पुणे**
**देणगी** - रु. ५५५/-
**दिनांक** - २.५.२०२४
**निमित्त** - स्वतःच्या वाढदिवसानिमित्त (२ मे)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग संस्थावाढीसाठी

**संस्थेच्या ११५ व्या वर्धापनदिनानिमित्त पदाधिकारी आणि सेवकांनी दिलेल्या देणग्या. सर्व देणग्यांचा विनियोग संस्थावाढीसाठी करण्यात येईल.**

●**नाव** - **श्री. कृष्णाजी मारुती कुलकर्णी, (मा. वि.) पुणे**
**देणगी** - रु. १,०००/-
**दिनांक** - १४.५.२०२४

●**नाव** - **श्री. पोपट मारुती शिंदे, पुणे**
**देणगी** - रु. २,५०१/-
**दिनांक** - १२.५.२०२४

●**नाव** - **श्री. मुकुंद यशंवत वाघ, पुणे**
**देणगी** - रु. २,०००/-
**दिनांक** - १२.५.२०२४

●**नाव** - **श्री. संजय वसंत बांगर, पुणे**
**देणगी** - रु. १,००१/-
**दिनांक** - १२.५.२०२४

●**नाव** - **श्री. राजेंद्र भास्कर काळे, पुणे**
**देणगी** - रु. १,००१/-
**दिनांक** - १४.५.२०२४

●**नाव** - **श्री. नंदकिशोर विष्णु ब्रह्मे, पुणे**
**देणगी** - रु. १,००१/-
**दिनांक** - १२.५.२०२४

●**नाव** - **श्री. सत्येंद्र श्यामसुंदर पेडणेकर, पुणे**
**देणगी** - रु. १,००१/-
**दिनांक** - १२.५.२०२४

●**नाव** - **सौ. सुवर्णा प्रकाश जोशी, पुणे**
**देणगी** - रु. १,००१/-
**दिनांक** - १२.५.२०२४

●**नाव** - **श्री. प्रशांत लक्ष्मण खरवलीकर, पुणे**
**देणगी** - रु. ५००/-
**दिनांक** - १२.५.२०२४

●**नाव** - **सौ. विद्या प्रसाद जोशी, पुणे**
**देणगी** - रु. ५०१/-
**दिनांक** - १२.५.२०२४

***

## हितचिंतक व आश्रयदाते यांच्या मदतीचे वृत्त, पंचवटी – नाशिक शाखा

**कोषाध्यक्ष – श्री. कृष्णाजी कुलकर्णी** **संचालक : श्री. अमोल जोशी**

### माहे मे २०२४

**पुढील देणगीदारांनी संस्थेला देणगी देऊन सक्रिय सहाय्य केलेले आहे. संस्थेविषयी असलेल्या आत्मीयतेबद्दल सर्वांचे आभारी आहोत.**

• **नाव - श्री. संजय दिगंबर दाते, मुंबई**
**देणगी** - रु. ३१,०००/-
**दिनांक** - १०.५.२०२४
**निमित्त** - कै. दिगंबर भास्कर दाते यांच्या १४ व्या पुण्यस्मरणार्थ
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग आश्रमस्थ विद्यार्थ्यांच्या अन्नखर्चासाठी

• **नाव - श्री. एस. के. लिमये, पुणे**
**देणगी** - रु. ६,०००/-
**दिनांक** - २३.५.२०२४
**निमित्त** - सौ. श्रुती लिमये - पिंपळे यांच्या नूतन घराच्या वास्तुशांतीनिमित्त
**विनियोग** - आश्रमस्थ विद्यार्थ्यांना साजूक तुपातील लाडू देण्यासाठी करण्यात आला.

• **नाव - श्री. दिनेश पितांबर मिसाळ, नेरुळ**
**देणगी** - रु. ५,०००/-
**दिनांक** - १७.५.२०२४
**निमित्त** - पंचवटी शाखेच्या ९८ व्या वर्धापन दिनानिमित्त
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग पंचवटी शाखा वाढीसाठी

• **नाव - श्री. विशाल नरेंद्र उपाध्याय, ठाणे**
**देणगी** - रु. १,०००/-
**दिनांक** - १.५.२०२४
**निमित्त** - सदिच्छा देणगी
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग आश्रमस्थ विद्यार्थ्यांच्या अन्नखर्चासाठी

**नाव** - श्री. व्ही. आर. जोशी, नाशिक
**देणगी** - रु. ५०१/-
**दिनांक** - १०.५.२०२४
**निमित्त** - सदिच्छा देणगी
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग आश्रमस्थ विद्यार्थ्यांच्या अन्नखर्चासाठी

***

## हितचिंतक व आश्रयदाते यांच्या मदतीचे वृत्त, नेरुळ–नवी मुंबई शाखा

**कोषाध्यक्ष – श्री. कृष्णाजी कुलकर्णी**
**कुलसचिव – श्री. दिनेश मिसाळ**
**दि. १.६.२०२४ ते १५.६.२०२४**

**पुढील देणगीदारांनी संस्थेला देणगी देऊन सक्रिय सहाय्य केलेले आहे. संस्थेविषयी असलेल्या आत्मीयतेबद्दल सर्वांचे आभारी आहोत.**



श्री. राजेंद्र काळंगे

**नाव** - श्री. राजेंद्र ओम काळंगे, नवी मुंबई
**देणगी** - रु. ५,०००/-
**दिनांक** - १५.६.२०२४
**विनियोग** - नेरुळ शाखा वाढीसाठी

**✻ संस्था मुख्यालय, पुणे ✻**



सौ. योगिनी मुकुंद पेठे यांनी दि. २२ जून २०२४ रोजी संस्थेस रु. १ लाखाची भरीव देणगी दिली. या प्रसंगी त्यांचे स्मृतिचिन्ह देऊन आभार मानताना सेवक श्री. महादेव काटे, समवेत सौ. योगिनी पेठे यांच्या कन्या सौ. संपदा मनोज नाफडे

## निधन वार्ता



कृ. पां. देशपांडे

संस्थेचे माजी संचालक, हितचिंतक, महाराष्ट्र विद्यालयाचे आदर्श शिक्षक, ज्येष्ठ लेखक आणि संशोधक आदरणीय श्री. कृष्णराव पंढरीनाथ तथा कृ. पं. देशपांडे यांचे रविवार दि. १६ जून २०२४ रोजी वयाच्या ८३ व्या वर्षी दुःखद निधन झाले.

संस्थेच्या महाराष्ट्र विद्यालयामध्ये पर्यवेक्षक व अध्यापक म्हणून ते ३१ वर्षे कार्यरत होते. सन १९९१ मध्ये 'आदर्श शिक्षक' या राष्ट्रीय पुरस्काराने त्यांना गौरविण्यात आले होते. 'मास महिमा - आश्विन' ला उत्कृष्ट वाङ्मयनिर्मितीबद्दल महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार (१९८१-८२) प्राप्त झाला होता. 'महानुभावांचे साती ग्रंथ : स्वरूप आणि समीक्षा' या त्यांच्या पीएच. डी. प्रबंधाला सन १९७९ - ८० मध्ये सर्वोत्कृष्ट प्रबंधाचे तीन पुरस्कार प्राप्त झाले होते.

त्यांचे आत्म्यास् शांती लाभो हीच श्री प्रभु रामचंद्र चरणी प्रार्थना ! ✻✻✻



बबन कुमकाले

**निधन वार्ता**

✻ संस्थेच्या महाराष्ट्र मुद्रण शाळे ऑफसेट विभागातील निवृत्त सेवक श्री. बबन नारायण कुमकाले यांचे सोमवार दि. १८ मार्च २०२४ रोजी वयाच्या ७३ व्या वर्षी अल्प आजाराने दुःखद निधन झाले.



श्रीमती विजया बडवे

✻ संस्थेच्या विद्याप्रशाला हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, तळेगाव (अंजनेरी), नाशिक येथील सेवानिवृत्त उपशिक्षिका व देणगीदार श्रीमती विजया बाबुराव बडवे यांचे दि. ३१ मे २०२४ रोजी वयाच्या ७८ व्या वर्षी प्रदीर्घ आजाराने दुःखद निधन झाले.

ईश्वर त्यांचे आत्म्यास सद्गती देवो ! ✻✻✻

## ❉ दि. २२ जून २०२४ विविध कार्यक्रम क्षणचित्रे ❉



दि. २२ जून २०२४ रोजी संस्थेच्या देणगीदार श्रीमती गंगूताई धामणकर यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांना पुष्पगुच्छ देऊन शुभेच्छा देताना कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे, समवेत संस्था पदाधिकारी आणि संचालक

संस्थेच्या देणगीदार श्रीमती गंगूताई धामणकर यांनी संस्थेस देणगी दिलेल्या त्यांच्या 'ब्रह्मानंद' या बंगल्याचे नामकरण 'पुणे विद्यार्थी गृहाचे धामणकर संकुल' असे करण्यात आले. या प्रसंगी उपस्थित संस्था पदाधिकारी आणि संचालक






'पुणे विद्यार्थी गृहाचे धामणकर संकुल' नामकरण कार्यक्रम प्रसंगी उपस्थित देणगीदार श्रीमती गंगूताई आणि श्रीमती सिंधुताई धामणकर या भगिनींसमवेत कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे, उपकार्याध्यक्ष श्री. एस. एम. जिर्गे, कार्यवाह श्री. संजय गुंजाळ, कोषाध्यक्ष श्री. कृष्णाजी कुलकर्णी, कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ, संचालक श्री. आंनद कुलकर्णी, श्री. सुनिल रेडेकर, श्री. रमेश कुलकर्णी, श्री. अमोल जोशी आणि डॉ. राजेंद्र कांबळे

Regd. Newspaper
Postal Reg. No. PCW / 168 / 2023-2025, Office of Posting *Pune PSO *GPO 411 001*
[Publication Date 13.7.2024 Posting Date 15.7.2024]
SAMACHAR - RNI No. 14546 / 1957. Decl. No. SDO / PUNE / SR / 74 / 2016
**License No. WPP - 56/2023-2025**

✻ अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय आणि जी. के. पाटे (वाणी) व्यवस्थापन महाविद्यालय, पुणे ९ ✻



मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागात ए एस एम इंटरनॅशनल पुणे, चॅप्टर तर्फे 'Hands on training on IPR' या विषयावर आयोजित फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रॅममध्ये पेटंट, कॉपीराइट आणि ट्रेडमार्क यावर माहिती देणारे विविध क्षेत्रातील तज्ज्ञ प्रोफेसर कुमार राजु, डॉ. दीप्ती पाटील, डॉक्टर तपोब्रता डे, प्रोफेसर ऋषिकेश टिके, ॲडव्होकेट क्षितिजा कुलकर्णी, ॲडव्होकेट लुनालीसा पी. यांच्या समवेत संचालक श्री. सुनिल रेडेकर आणि प्रा. राजेंद्र कडुसकर, प्र. प्राचार्य डॉ. मनोज तारांबळे, डॉ. एम. एम. भूमकर आणि सहभागी प्राध्यापक आणि सेवक

♦ पुणे विद्यार्थी गृह ♦
▣ पुणे शाखा - (०२०) २४४७०९२७, २४४७०५७३, २४४७९०५८
▣ मुंबई शाखा : (०२२) २५०६२३२२ फॅक्स : (०२२) २५०६४९३५ ▣ नवी मुंबई (नेरुळ) (०२२) २७७२३४१८
▣ नाशिक शाखा : (०२५३) २५११३०६ ▣ म्हसरुळ: (०२५३) २५३४२९१ ▣ तळेगाव अंजनेरी शाखा: (०२५९४)२२२२२७
कृपया आपल्या प्रतिक्रिया pvgsamachar@gmail.com या ई मेल वर नोंदवाव्यात.

**This monthly Samachar is printed on behalf of Pune Vidyarthi Griha by Printer and Publisher Mr. Subhash Mallappa Jirge at Maharashtra Mudranshala Chhapkhana, 1786, Sadashiv Peth, Pune 411030 and Published at Pune Vidyarthi Griha, 1786, Sadashiv Peth, Pune 411030.**
**Editor : Mr. Rajendra Vitthal Borhade**

समाचार हे मासिक पुणे विद्यार्थी गृह संस्थेकरिता मुद्रक, प्रकाशक श्री. सुभाष मल्लाप्पा जिर्गे यांनी महाराष्ट्र मुद्रणशाळा छापखाना, १७८६ सदाशिव पेठ, पुणे ४११०३० येथे छापून पुणे विद्यार्थी गृह, १७८६ सदाशिव पेठ, पुणे ४११०३० येथे प्रसिद्ध केले.
संपादक श्री. राजेंद्र विठ्ठल बोऱ्हाडे